उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थासाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
VEGETARIAN
राजमोती साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरुवार दि. १९.०९.२०२४ | अंक नं. १७० | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020




पीव्हीसी कारपेट, उडन स्ट्रीप-फ्लोरिंग, वॉलपेपर, वेलवेट कारपेट, गालिचा, रोमन-रोलर- व्हर्टिकल्स - क्लॉथ कर्टन्स व कर्टन्स फिटिंग, सोफा व सोफा मटेरियल,मॅट, मॅटिंग, रबर मॅट, सॉफ्ट - हार्ड मॅट, ग्रीन ग्रास, हिरवी जाळी, मच्छर जाळी, प्लास्टिक मॅट-चटई, कुशन्स-पिलोज, बेडशीट, ब्लॅंकेट, सोफा कव्हर्स, योगा मॅट, क्लिनिंग मटेरियल
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

## गोवंश वाचवा, गोशाळांना अनुदान देण्याच्या मागणीसाठी राज्यव्यापी बेमुदत उपोषण सुरु

आळंदी - देशी गोवंशाचे संरक्षणार्थ तसेच राज्यातील गोशाळा यांना प्रति गायी १०० रुपये दैनंदिन अनुदान आणि गायींसाठी गायरान जमिनी मिळाव्यात या मागण्यांसाठी अखिल भारत कृषी गोसेवा संघ, पश्चिम महाराष्ट्रच्या वतीने आळंदी येथील इंद्रायणी नदी घाटावर गोभक्त मिलिंद एकबोटे आणि सहकारी गोभक्त १९ सप्टेंबरपासून बेमुदत उपोषणास बसले आहेत.


देशी गोवंश बचावसाठी जनआंदोलन इंद्रायणी घाटावर बेमुदत उपोषणास बसलेले मिलिंद एकबोटे व गोभक्त.

माजी नगरसेवक मिलिंद एकबोटे यांनी हरिनाम गजरात गायीची पूजा करून उपोषण सुरू केले आहे. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी गणेश हुलावळे, नवनाथ महाराज शिंदे, निलेश देशमुख,भगवान कोकरे महाराज यांचेसह गोशाळा चालक, गोभक्त, भाविक उपस्थित होते. देशी गोवंश बचाव जनआंदोलनच्या माध्यमातून प्रमुख मागण्यांमध्ये देशी गोवंशासाठी प्रतिदिन, प्रति गोवंश शंभर रुपये अनुदान, राज्यातील गायरानाची जमिन गोपालन, चारा लागवड यासाठी उपलब्ध करून देणे, रस्त्यावरील मोकाट फिरणाऱ्या गोवंशाच्या संरक्षणासाठी ठोस उपाययोजना, इंद्रायणी नदी प्रदूषण मुक्त करणे अशा विविध मागण्याचा समावेश असल्याचे एकबोटे यांनी सांगितले.

श्रीक्षेत्र आळंदी येथील इंद्रायणी नदी घाटावर उपोषण सुरू झाले असून या आंदोलनात सर्वांनी सहभागी होऊन गोवंश वाचविण्यास पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील गोरक्षक आणि गोशाळा चालक यांच्या वतीने उपोषण होत आहे. देशी गोवंशाची कत्तल होत असल्याने गोवंश कमी होत असल्याचे पशु जनगणनेत उघड झाले आहे. गोशाळांच्या अनेक समस्या आहेत. त्यात आर्थिक समस्या देखील आहे. चारा, पत्रा शेड, गोपालक कामगार पगार, देखभाल दुरुस्ती, आरोग्य सेवा आदींचा समावेश आहे. सर्वत्र शेतीसह आरोग्यास उपयुक्त असलेल्या गोवंशाच्या संरक्षणास महाराष्ट्र शासनाने अनुदान देऊन गायींना राजाश्रय द्यावा तसेच देशातील इतर राज्या प्रमाणे जसे कि, गुजरात, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान या राज्यांत देशी गोवंशाच्या पालनास अनुदान दिले जाते. त्याच प्रमाणे महाराष्ट्र राज्यांत देखील प्रगत राज्य असल्याने गायीचे संरक्षणार्थ अनुदान देण्यात यावे.

### 'लाडकी गायी अनुदान' योजना सुरु करा

महाराष्ट्र हे प्रगत राज्य असून देखील राज्यात देशी गोवंश वाचविण्यासह गोशाळा अनुदान देण्यासाठी तात्काळ निर्णय व्हावा. या मागणीसाठी बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे एकबोटे यांनी सांगितले. राज्यात आम्ही महायुतीचे समर्थक आहोत. गोमातेच्या आस्थेपोटी शासनाने याकडे लक्ष वेधण्यासाठी पर्याय नसल्याने उपोषण करीत न्याय मिळविण्यासाठी दाद मागत आहे. राज्यात ज्याप्रमाणे लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. त्याच धर्तीवर लाडकी गायी योजना सुरु करावी अशी मागणी केली आहे.

## भारतीय शेअर मार्केटने रचला नवा इतिहास; सेंसेक्स, निफ्टीने गाठला नवा विक्रमी उच्चांक

नवी दिल्ली - अमेरिकेतील फेडरल रिझर्व्ह बँकेने व्या जदरात कपात केल्यामुळे त्याचे सकारात्माक पडसाद भारतीय शेअर बाजारावर गुरुवारी (दि. १९ सप्टेंबर) सुरुवातीच्याब व्यनवहारावर दिसून येत आहे. भारतीय शेअर बाजारात सुरुवातीला सेन्सेक्स-निफ्टीमध्ये विक्रमी उच्चांक गाठत तेजीत सुरु आहे. देशांतर्गत शेअर बाजार निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टीने विक्रमी उच्चांक गाठला. आज सेन्सेक्सने ८३,३५९.१७ ची विक्रमी पातळी गाठली आहे. तर निफ्टी प्रथमच २५,५०० च्या वर गेला आहे. यूएस फेडरल रिझर्व्हने व्याजदरात ०.५० टक्के कपात केली आहे. त्याचा परिणाम शेअर मार्केटवर झाला आहे.

ऑईल आणि गॅस वगळता निफ्टीच्या सर्व क्षेत्रातील निर्देशांक ग्रीन झोनमध्ये आहेत. रियल्टी आणि आयटीचा निफ्टी निर्देशांक १-१ टक्क्यांहून अधिक वधारला आहे. मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समध्येही खरेदीचा चांगला कल आहे. एकंदरीत बीएसईवर लिस्टेड कंपन्यांचे मार्केट कॅप ३.०९ लाख कोटी रुपयांनी वाढले आहे, म्हणजेच बाजार उघडताच गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ३.०९ लाख कोटी रुपयांची वाढ झाली.

अमेरिकेतील फेडरल रिझर्व्ह बँकेने चार वर्षानंतर व्याजदरात कपात केल्याहने कर्ज स्ववस्तव झाले आहे. त्यांमुळे आर्थिक मंदीचे सावट हटले आहे. जपानचा बाजार २ टक्क्यांनी वाढला आहे. याचा सकारात्मयक परिणाम आज भारतीय शेअर बाजारावर दिसून आला. आज सुरुवातीच्याज व्यीवहारात मिडकॅप आयटी समभागांमध्ये चांगली वाढ झाली.

बीएसई सेन्सेक्स ४१०.९५ अंकाच्या वाढीसह ८३,३५९.१७ वर सुरू झाला आणि एनएसई निफ्टी १०९.५० अंक किंवा ०.४३ टक्क्यांच्या वाढीसह २५,४८७.०५ वर सुरू झाला. बँक निफ्टी त्याच्या सार्वकालिक उच्चांकाने फक्त ४ अंकांनी मागे होता पण त्याचे शेअर्स मार्केटला मोठा उत्साह देत आहेत.

बुधवारी (दि.१८) आयटी शेअर्समध्ये घसरण झाली होती पण आज यूएस फेडरल रिझर्व्हच्या निर्णयामुळे आयटी शेअर्स प्रचंड वाढले आहेत. मिडकॅमध्ये १ टक्के आणि स्मॉलकॅपमध्ये अर्धा टक्का वाढ झाली आहे.

## आरक्षण मिळण्यासाठी मराठा समाजाचे नगरमध्ये २० सप्टेंबरपासून उपोषण

नगर - मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे अंतरवली सराटी येथे उपोषणास बसले आहेत. त्यांच्या समर्थनार्थ नगर शहरातही मराठा समाजाचे प्रतिनिधी २० सप्टेंबरपासून आमरण उपोषणास बसणार आहेत. तसा इशारा समाजाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी करणे, शिंदे समितीस मुदतवाढ देवून तिचे कामकाज चालू ठेवावे, मराठा आंदोलकावरील सर्व गुन्हे मागे घ्यावेत, हैदराबाद, सातारा, मुंबई गॅझेट लागू करावे आदी मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा आमरण उपोषण सुरू केले आहे. सरकारने त्यांच्या मागण्या मान्य न केल्यास जरांगे यांच्या समर्थनार्थ अखंड मराठा समाजाच्यावतीने नगर तहसील कार्यालय येथे गोरख दळवी, संतोष आजबे, सखाराम गुंजाळ यांच्यासह काही मराठा बांधव आमरण उपोषणास बसणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## नगर अर्बन बँकेच्या थकबाकीदार कर्जदारांची यादी फ्लेक्स बोर्डवर शहरातील चौका-चौकात लावणार

### थकबाकीची रक्कम त्वरित भरावी; बँक बचाव समितीचे डी.एम. कुलकर्णी यांचे आवाहन

नगर - नगर अर्बन बँकेच्या सर्व थकबाकीदार कर्जदारांची यादी मोठ्या फ्लेक्स बोर्डवर लिहून असे फ्लेक्स बोर्ड शहरातील मोजक्या आठ ते दहा चौकात प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. त्यातील कर्जदारांची नावे जनतेस माहिती होतील व त्याद्वारे यदाकदाचित कर्जदारांची बदनामी होऊ शकते. हे टाळण्यासाठी सर्व कर्जदारांनी योग्य तो प्रतिसाद द्यावा, असे आवाहन बँक बचाव समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

संदर्भात नगर अर्बन बँक बचाव समिती सदस्य डी. एम. कुलकर्णी यांनी कर्जदारांना आवाहन केले आहे. त्यात म्हटले आहे की, नगर अर्बन बँक बंद पाडण्यात बँकेचे तत्कालीन चेअरमन, संचालक व काही भ्रष्ट अधिकारी व मोठे कर्ज थकबाकीदार यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. आपण संगनमत करून मोठमोठ्या रकमांचे अनेक प्रकारचे कर्ज घेतले आहे. हे कर्ज भरण्यासही आपण हेतुपुरस्सर टाळाटाळ करीत आहात व केलेली आहे. व अजुनही आपण कर्ज रकमा भरण्याची आपली इच्छा दिसून येत नाही. यास्तव बँकेचे ठेवीदार अधिक आक्रमक झालेले आहेत.

आपल्या कर्जाच्या रकमांची वसुली होण्यासाठी आपणांवर कायदेशीर पोलीसी कारवाई होण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाकडे आपल्या कर्जाची तपशीलासह यादी सादर केली आहे. पोलीस प्रशासनाकडे ठेवीदार आग्रही मागणी करीत असून सर्व लहान मोठ्या कर्जदारांवर कायदेशीर पोलीस कारवाई करण्यासाठी व आपणांस आरोपी म्हणून जाहीर करण्यासाठी पोलीस प्रशासनाकडे ठेवीदार पाठपुरावा करीत आहे.

आपणावर आरोपी म्हणून पोलीसी कारवाई होऊन आपणास अटकेची व पोलीसी खाक्याची अंतिम कारवाई होऊ नये असे वाटत असेल तर कर्जाची संपूर्ण रक्कम व्याज मुद्दलासह बँकेत भरून कायदेशीर कारवाई टाळू शकता. तसेच बँकेने एकरकमी कर्जफेड योजना चालू केलेली आहेच. त्याही योजनेचा फायदा घेऊन आपणाकडील कर्ज रक्कम सत्वर बँकेत भरणा करावी. अन्यथा १५ ते २० दिवसांच्या अंतिम मुदतीनंतर आपणावर पोलीसी कारवाई निश्चित होण्यासाठी ठेवीदार पोलीस प्रशासनाकडे सर्व मार्गाने प्रयत्न करणार आहोत, असे कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

2 BHK फ्लॅट भाड्याने देणे
सारडा कॉलेज व सिव्हिल हॉस्पिटल जवळील पत्रकार चौकातील मनमाड रोड टच.
2 BHK फ्लॅट त्वरित भाड्याने देणे
9881141240

Sintex PVC DOORS
Ideal for Bathroom Toilet & Kitchen
BHINGARWALA ENTERPRISES
Near Swastik Chowk, Station Road. Ahmednagar. Mob 9422224990

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

धनश्री उद्योग
सरकारमान्य संस्था
घरातून काम करा व रोज कमवा
500 ते 1000 रु.
बाराही महीने विविध पॅकिंगचे व्यवसाय करा..
माल फ्री घरपोहोच
अंबर प्लाझा बेसमेंट, नमो मेडिकलच्या खाली, माळीवाडा एस.टी. स्टॅण्ड समोर, अ.नगर.
7066575497

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## पूर्वजांविषयी कृतज्ञतेची महालयारंभ




कृतज्ञता भाव व्यक्त करणारा पितृपक्ष पंधरवडा प्रारंभ झालाय. या जगतात आज असलेले आमचे अस्तित्व आहे ते या थोर पितरांमुळेच. आम्हांला जगाचा इतिहास ठाऊक असतो. पण ज्यांच्या कृपेने हे अस्तित्व आहे त्यापैकी आमच्या खापर पणजोबांचे नावही आम्हांला ठाऊक नसते. पण ते होते म्हणूनच आम्ही आहोत हे मात्र सत्य आहे. भारतीयांच्या वंश उगमाचे मुळपुरुष हे विश्वामित्र, जमदग्नी, भारव्दाज, गौतम, अत्री, वशिष्ठ, कश्यप आणि अगस्ती हे आठ ऋषी समजले जातात. त्यांच्यापासून जवळपास ५० प्रमुख गोत्रांचा विशाल परिवार देशभरात निर्माण झालाय.

या आमच्या पूर्वजांचे किती किती म्हणून उपकार सांगावेत? आज जगात विज्ञान.. तंत्रज्ञानक्षेत्रात प्रगती झालीय. माहितीचे स्रोत घरबसल्या उपलब्ध आहेत. तरीही या प्रगतीनंतरही घर कुठे घ्यावे हा प्रश्न पडतो. पण हजारो वर्षे सुविधांचा अभाव असतानाही आमच्या पूर्वजांनी जिवापाड संघर्ष करुन आमच्या घराण्याची वंशवेल.. धर्म.. संस्कृती.. स्वातंत्र्य अबाधित राखलेय.



आमच्या पूर्वजांनी अतिवृष्टी.. महापूर.. अवर्षण.. भूकंप अशा घटनांचा.. अचानक उद्‌भवणाऱ्या अनाकलनीय साथीच्या रोगांचा.. लहरी जुलमी परकीय आक्रमकांचा सामना केलाय. जीव वाचवत प्रसंगी रानोमाळ भटकत डोंगर दऱ्यात ते आश्रय घ्यायचे. या सर्वच संकटातून वाट काढून कुटुंबाचे पालनपोषण केलेय.. ही वंशवेल वाढवलीय. आदर्श समाजव्यवस्था निर्माण करणाऱ्या परंपरा.. रीतीरिवाज.. श्रद्धास्थाने यांचे रक्षण केलेय. या त्यांच्या कार्यामुळेच आज आम्ही हे आनंदी जीवन जगतोय. येत्या पंधरा दिवसात पितरांविषयी हाच कृतज्ञता भाव श्रद्धापूर्वक श्राद्धातून व्यक्त केल्या जाणार.



२० सप्टेंबरला ईद मिलादुन्नबीच्या झेंडा मिरवणुकीच्या दिवशी शासन आदेशाप्रमाणे सुट्टी जाहीर करावी, या मागणीचे निवेदन उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना देताना माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसाक व शिष्टमंडळातील इतर पदाधिकारी व सदस्य.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही त्रुटी, हलगर्जीपणा खपवून घेणार नाही

### सुमित वर्मा यांचा इशारा; शहरातील विविध शाळांच्या सुरक्षिततेची मनविसेकडून पाहणी

नगर - बदलापूर येथे घडलेली दुर्दैवी घटना पुन्हा कोणत्याही शाळांमध्ये घडू नये, याची खबरदारी सर्व शैक्षणिक संस्थांनी घेणे आवश्यक आहे. याबाबत राज्य शासनाने जारी केलेल्या शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेसंबंधीच्या नियमांची अंमलबजावणी काटेकोरपणे सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये झाली पाहिजे. शैक्षणिक संस्थानी विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेला सर्वाधिक प्राधन्य द्यावे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही त्रुटी, हलगर्जीपणा मनविसे खपवून घेणार नाही. ज्या शाळा महाविद्यालयांनी अद्याप विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या उपाययोजनांची अंमलबजावणी केली नाही त्यांनी ८ दिवसात कराव्यात, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या विद्यार्थी सेनेचे राज्य उपाध्यक्ष सुमित वर्मा यांनी दिला आहे.



मनविसेतर्फे शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांची पाहणी करून विद्यार्थी सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर मुख्याध्यापकांशी चर्चा केली तसेच चांगल्या उपाययोजना राबवणाऱ्या मुख्याध्यापकांचा सत्कारही केला. यावेळी राज्य उपाध्यक्ष सुमित वर्मा, प्रकाश गायकवाड, श्रद्धा खोंडे, अनिकेत शियाळ आदींसह पदाधिकारी.

नगर शहर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या विद्यार्थी सेनेच्या वतीने शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांची पाहणी करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत कोणकोणत्या उपाययोजना राबविल्या जात आहेत, शासनाच्या अध्यादेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे होत आहे की नाही याची पहाणी सुमित वर्मा यांच्या नेतृत्वाखालील शिष्ठमंडळाने करून मुख्याध्यापक व प्राचार्यांशी संवाद साधला. यावेळी मनविसेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी सुमित वर्मा म्हणाले, शहरातील शाळा महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र घेणे, सखी सावित्री समिती, विशाखा समिती आदी बाबतची पहाणी आम्ही केली. यामध्ये काही ठिकाणी बऱ्याच त्रुटी आढळल्या तर काही ठिकाणी सर्व नियमांचे काटेकोर पालन केले जात असल्याचे दिसले. ज्या संस्थांमध्ये सर्व काही व्यवस्थित आहे अशा संस्थांचा आम्ही शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार देखील केला. पण ज्या ठिकाणी सुरक्षिततेबाबत त्रुटी आढळलेल्या आहेत त्यांना अजून आठ दिवसांची मुदत देत कडक शब्दात ताकीद देत त्या संबंधित लेखी आश्वासन घेतले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड, हलगर्जीपणा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना खपवून घेणार नाही. यावेळी बऱ्याच शाळांनी विद्यार्थीनींना टारगट मुलांचा होणारा त्रास आणि शाळा महाविद्यालय परिसरातील सुरु असलेल्या अवैध धंद्यांबाबत तक्रारी केल्या आहेत. याबाबत लवकरच जिल्हा पोलीस प्रशासनाची भेट घेऊन या अडचणी सोडवण्याची मागणी करणार आहोत. ही मोहीम एवढ्यावरच थांबणार नाही तर संपूर्ण जबाबदारीने पूर्णत्वास नेऊन विद्यार्थ्यांचे हित जपणार आहोत.

यावेळी जिल्हाध्यक्ष प्रकाश गायकवाड, युवती जिल्हाध्यक्ष श्रद्धा खोंडे, शहराध्यक्ष अनिकेत शियाळ, तालुका सचिव अक्षय बेरड, अंबरनाथ भालसिंग, प्रवीण गायकवाड, आयुष नागरे, राहुल वर्मा, प्रसाद साळवे, रोमन भागवत, उपनगर अध्यक्ष रक्षंदा बोवर, समृद्धी बोवर, शहर उपाध्यक्ष सागर मेहसुनी आदींसह कार्यकर्ते सहभागी होते.

## २० सप्टेंबरला ईद मिलादुन्नबीच्या झेंडा मिरवणुकीच्या दिवशी शासन आदेशाप्रमाणे सुट्टी जाहीर करावी

नगर - अहमदनगर जिल्ह्यात मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त २० सप्टेंबर रोजी झेंडा मिरवणूक काढण्यात येणार असून या दिवशी शासन आदेशाप्रमाणे सुट्टी जाहीर करण्याच्या मागणीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र कुमार पाटील यांना निवेदन देताना माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक, अयाज बागवान, शोएब कुरेशी, नासिर सय्यद, एजाज हाजी, साबील सय्यद आदी उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, इस्लाम धर्माचे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांची जयंती १६ सप्टेंबरला होती मात्र अनंत चतुर्दशी निमित्त मिरवणुकीचा मार्ग एकच असल्याने झेंडा मिरवणूक पुढे ढकलून २० सप्टेंबरला शुक्रवारी आयोजित करण्यात येणार आहे.

त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यात होणाऱ्या मुस्लिम समाजाची झेंडा मिरवणूक दिनांक विचारात घेऊन २० सप्टेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी व आदेश काढण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## लक्ष्मणराव नवले यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील नवलेवाडी गावातील जुन्या पिढीतील शेतकरी लक्ष्मणराव दगडू नवले (वय ९४) यांचे वृद्धापकाळामुळे निधन झाले.

त्यांच्या पश्चात मधुकर, भागवत व अरुण नवले ही तीन मुले, चार मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर नवलेवाडी फाटा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

गेल्या महिन्यात १३ ऑगस्ट रोजी त्यांच्या पत्नी राधाबाई नवले यांचे निधन झाले होते.

# नगर जिल्ह्यात शनिवारी पावसाचा 'यलो अलर्ट'

मुंबई - राज्यात काही काळाचा ब्रेक घेतल्यानंतर पाऊस पुन्हा एकदा ॲक्टीव्ह मोडवर येणार आहे. भारतीय हवामान विभागाने शनिवार (दि.२१ सप्टेंबर) पासून पुन्हा धुव्वाधार पावसाचा इशारा दिला असून मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. २० सप्टेंबर रोजी जळगाव जालना, परभणी, हिंगोली, नांदेड जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. १ सप्टेंबर रोजी संपूर्ण विदर्भ, मराठवाड्याला यलो अलर्ट देण्यात आला असून मध्य महाराष्ट्रातील अहमदनगर, सोलापूर जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. २२ सप्टेंबर रोजी संपूर्ण विदर्भात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. उर्वरित भागात पावसाचा जोर ओसरणार असल्याचा अंदाज आहे.

## तरुणीने केली युवकाला धारदार वस्तूने मारहाण

नगर - गणपती विसर्जन मिरवणूक संपवून घरी जात असलेल्या २० वर्षीय युवकाला तरुणीने धारदार वस्तूने मारून जखमी केले. तो बोल्हेगाव उपनगरात राहात असून त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याने उपचारादरम्यान पोलिसांना दिलेल्या जबाबावरून कोतवाली पोलीस ठाण्यात बुधवारी (दि.१८) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी हे मंगळवारी (दि.१७) रात्री नगर शहरातून निघालेल्या गणपती विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाले होते. मिरवणूक संपल्यानंतर ते घरी जात असताना गांधी मैदानाजवळ रात्री १.२० वाजेच्या सुमारास फिर्यादीच्या ओळखीची २३ वर्षीय तरुणी त्याला भेटली. तिने त्याला बोलायचे आहे म्हणून बाजूला नेले व तेथे गेल्यानंतर तिने धारदार वस्तूने त्यांच्यावर वार केले. तसेच शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. या मारहाणीत फिर्यादी जखमी झाला. त्यास एकाने उपचारासाठी रुग्णालयात नेले. त्याच्या दवाखान्यातील जबाबावरून पोलिसांनी त्या तरुणीवर गुन्हा दाखल करत दुपारी तिला अटक केली आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

## देवानंद पाडळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - बोल्हेगाव फाटा, नगर येथील रहिवासी देवानंद नारायणराव पाडळे (वय ६५) यांचे १७ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर बुऱ्हाणनगर रोड येथील ख्रिश्चन धर्म कब्रस्तानमध्ये दफनविधी करण्यात आला.

त्यांच्या मागे पत्नी, २ भाऊ, भाऊजया, पुतणे असा परिवार आहे. देवानंद पाडळे यांनी एस.टी. महामंडळात अनेक वर्षे नोकरी केली. पूर्वी ते प्रकाशपूर (तारकपूर) येथे राहात होते.

# साकळाई योजनेसाठी २२ सप्टेंबरला नगर-दौंड महामार्गावर 'रास्ता रोको'

### सरकारचे लक्ष वेधण्यासाठी कृती समितीचा इशारा, लाभधारक शेतकरी आक्रमक

नगर - साकळाई उपसा जलसिंचन पाणी योजनेसाठी उपमुख्यमंत्री तथा जलसंपदामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द पूर्ण करावा. योजनेसाठी लागणारे पाणी उपलब्ध प्रमाणपत्र तातडीने देण्यात यावे या मागणीसाठी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी साकळाई कृती समितीच्यावतीने रविवारी (दि. २२ सप्टेंबर) नगर दौंड महामार्गावर खडकी येथे रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

गेल्या ३० वर्षांपासून नगर व श्रीगोंदा तालुक्यातील ३० ते ३५ गावातील नागरिकांनी साकळाई पाणी योजनेसाठी लढा सुरु केला आहे. लाभधारक क्षेत्रातील ३५ गावांमधील नागरिकांनी योजनेसाठी वारंवार आंदोलन, उपोषण, मोर्चे, रास्तारोको, निवेदने देऊन सरकारता आठवण करुन देण्याचे काम केले आहे. परंतु, अद्यापही साकळाई योजनेता प्रश्न मार्गी लागलेता नाही. गत लोकसभा निवडणुकीच्यावेळी वाळकी येथे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना साकळाई योजना मार्गी लागण्याचा शब्द दिला होता.

आताही राज्यात महायुतीचे सरकार आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डिले, आमदार बबनराव पाचपुते यानी पाठपुरावा करुन साकळाईच्या सर्व्हेक्षणाचे आदेश काढले. तसेच सर्व्हेक्षणासाठी निधी टाकून कामही पूर्ण झाले आहे. आता योजनेसाठी पाणी उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. यासाठी कृती समितीचा पाठपुरावा सुरु आहे. साकळाई योजना पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे.

ऑगस्ट महिन्यात शेतकऱ्यांनी चिखली येथे रास्तारोको केला होता. आता पुन्हा २२ सप्टेंबर रोजी नगर दौंड महामार्गावर खडकी येथे रास्तारोकोचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच या रास्तारोको आदोलनामध्ये शेतकऱ्यांनी हक्काच्या पाण्यासाठी सहभागी व्हावे असे आवाहन कृती समितीचे अध्यक्ष हभप बाबा महाराज झेंडे, समाजसेवक भापकर गुरुजी, नारायण रोडे, संतोष लगड, सोमनाथ धाडगे, धामणे सर, शिवाजीराव विधाटे, रामदास झेंडे, रोहिदास उदमले, अमोल लंके, सोन्याबापू वाणी, राजेंद्र झेंडे, पुरुषोत्तम लगड, प्रतापराव नलगे आदींनी केले आहे.

### शुक्रवारी सिंचन भवनला शेतकरी मांडणार ठाण

गेल्या अनेक दिवसांपासून साकळाई योजनेचा प्रश्न भीजत पडला आहे. परंतु योजनेचा प्रश्न अद्यापही मार्गी लागलेला नाही. योजनेसाठी पाणी उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र मिळत नाही. त्यामुळे साकळाई कृती समिती शुक्रवारी (दि. २० सप्टेंबर) सिंचन भवन येथे ठाण मांडून याबाबतचे निवेदन देणार असल्याची माहिती कृती समितीच्या वतीने देण्यात आली.

### कृती समितीकडून पालकमंत्र्यांची भेट

साकळाई कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी बुधवारी (दि.१८) पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेत योजनेबाबत सविस्तर चर्चा केली. पाणी उपलब्धतेबाबत कृती समितीच्यावतीने निवेदन देण्यात आले. साकळाई योजनेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्नशील असून याबाबत लवकरच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत कृती समितीची बैठक आयोजित करण्यात येईल असे आश्वासन पालकमंत्री यांनी यावेळी दिले. कृती समितीचे अध्यक्ष बाबा महाराज झेंडे, ज्ञानदेव भोसले, संतोष लगड, प्रतिभाताई धस, बाळासाहेब नलगे, सुरेश काटे, नारायण रोडे, रोहिदास उदमले, डॉ. योगेंद्र खाकाळ, राजेंद्र झेंडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## साहेबराव झरेकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - तालुक्यातील घोसपुरी येथील साहेबराव झरेकर बाबा (वय ८३) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पाठीमागे पत्नी, तीन, मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची समाजामध्ये माणसं जोडणारा माणूस म्हणून ओळख होती. ते सर्वत्र बाबा या नावाने परिचित होते.

माणसे कशी जोडावी हे आपण साहेबराव झरेकर यांच्याकडून शिकले पाहिजे ही एक कला आहे. सर्वांनाच ती जमत नाही. त्यांचे आठवीपासूनचे शिक्षण भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर त्यांनी शिक्षण क्षेत्रात गुरुजी या पदावर काम केले. त्यांची पत्नी शकुंतला झरेकर या देखील शिक्षिका म्हणून काम केलेले आहे. त्या दोघांनी शिक्षण क्षेत्राला अक्षरशः वाहून घेत अनेक विद्यार्थी घडविण्याचे काम केले. त्यांचा संपूर्ण परिवार उच्चशिक्षित असून उच्च पदावर काम करत आहे. अशी माहिती दरेकर व्ही जे यांनी दिली.

## दतात्रय मुंढे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - नगरमध्ये केडगांव भागातील भूषणनगर येथील रहिवासी येथील दत्तात्रय हरिभाऊ मुंढे (वय ६२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, मुलगी, भाऊ, भावजयी, पुतणे असा परिवार आहे. ते अत्यंत धार्मिक व मनमिळावू स्वभावाचे होते.

## आदर्श शिक्षिका श्रीमती कुसुम पाटील यांचे निधन



आळंदी - येथील आदर्श शिक्षिका श्रीमती कुसुम श्रीधर पाटील (वय ८६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. बाईंनी त्यांच्या जीवनात असंख्य गुणवान विद्यार्थी घडवले. त्यांच्या पाठीमागे त्यांचे चिरंजीव दीपक, सून सुनीता, विवाहित कन्या रजनी व संगीता, नातू घनश्याम व लोकेश तसेच नातसुना चित्रलेखा आणि निकिता व पत्तवंडे योशीत आणि रेवांश असा परिवार आहे.

श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे खजिनदार डॉ. ज्ञानेश्वर उर्फ दीपक श्रीधर पाटील यांच्या त्या मातोश्री होत.

# हिंदूंवरील अत्याचार थांबत नाही तोपर्यंत भारत-बांगलादेश क्रिकेट सामने रद्द करा

### हिंदु जनजागृती समितीची निवेदनाद्वारे 'बी.सी.सी.आय.'कडे मागणी

नगर - आजही बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचार चालू असतांना बांगलादेश आणि भारत यांच्यात क्रिकेटचे सामने आयोजित करणे हा हिंदूंच्या जखमेवर मीठ चोळण्याचा संतापजनक प्रकार आहे. जोपर्यंत बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचार थांबत नाहीत, तोपर्यंत भारत-बांगलादेश यांच्यातील सर्व क्रिकेट सामने आणि बांगलादेशी कलाकारांचे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात यावेत, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने 'भारतीय क्रिकेट नियामक मंडळा'कडे (BCCI) केली आहे. याविषयीचे निवेदन हिंदू जनजागृती समितीच्या वतीने 'भारतीय क्रिकेट नियामक मंडळ' येथील विशेष कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले. या वेळी हिंदू जनजागृती समितीचे अधिवक्ता अनीश परळकर, मानव सेवा प्रतिष्ठानचे विनायक शिंदे, धर्मप्रेमी अधिवक्ता राहुल पाटकर, रविंद्र दासारी, संदीप तुळसकर हे उपस्थित होते. या निवेदनाची प्रत पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय क्रीडामंत्री आणि परराष्ट्रमंत्री यांनाही देण्यात आली आहे.




हिंदूंवरील अत्याचार थांबत नाही तोपर्यंत भारत-बांगलादेश क्रिकेट सामने रद्द करा, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीची निवेदनाद्वारे 'बी.सी.सी.आय.'कडे मागणी करण्यात आली.

या वेळी सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बांगलादेशसोबत भारताचे क्रिकेटचे दोन कसोटी सामने आणि तीन टी-२० सामने १९ सप्टेंबर ते १२ ऑक्टोबर या कालावधीत भारतात आयोजित करण्यात आले आहेत. हे क्रिकेट सामने चेन्नई, कानपूर, ग्वालियर, दिल्ली आणि हैदराबाद येथे होणार आहे. दुसरीकडे बांगलादेशातील हिंदू समाजावर सातत्याने हल्ले चालू आहेत.

मुसलमान समाजावर होणाऱ्या कोणत्याही आघाताला इतर मुसलमान देश तीव्र विरोध करतात, तशीच भूमिका भारताने हिंदूंवरील हल्लयांच्या विरोधात घ्यावी. बांगलादेशात तेथील धर्मांध जिहादी हिंदूंच्या राजरोसपणे हत्या करणार, हिंदूंची घरे जाळणार, हिंदूंच्या मंदिरांची तोडफोड करणार, भूमी बळकावणार, हिंदू महिलांवर बलात्कार करणार आणि आम्ही त्यांच्यासोबत क्रिकेटचे सामने खेळायचे का? हे आम्ही कदापी सहन करणार नाही, असे समितीने म्हटले आहे.

## बस प्रवासात महिलेच्या गळ्यातून गंठणची चोरी

### सीसीटीव्हीत कैद झालेल्या २ संशयित महिलांवर गुन्हा दाखल

नगर - बस मधून प्रवास करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील दीड लाख रूपये किमतीचे तीन तोळ्याचे सोन्याचे गंठण दोन महिलांनी चोरून नेले. सदरची घटना श्रीरामपूर ते पुणे जाणाऱ्या बसमध्ये घडली आहे.

या प्रकरणी दोन अनोळखी महिलांविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बेबी बाळासाहेब शहाणे (वय ५२, रा. सोनार गल्ली, पारनेर रस्ता, सुपा, ता. पारनेर) यांनी फिर्याद दिली आहे. त्या सून व नातवासह सोमवारी (दि.१६) सकाळी नगर शहरात आल्या होत्या. नगर मधील काम उरकल्यानंतर ते तिघे घरी जाण्यासाठी पुणे बस स्थानकावर आले होते.

ते श्रीरामपूर ते पुणे जाणार्या बस मध्ये बसून घरी जात असताना बसमध्ये त्यांच्याजवळ दोन अनोळखी महिला थांबल्या होत्या. बसमध्ये गर्दी होती. गर्दीचा फायदा घेत त्या दोन महिलांनी फिर्यादीच्या गळ्यातील तीन तोळ्यांचे गंठण चोरले. दरम्यान, बस काही अंतरावर गेल्यानंतर त्या महिलांनी त्रास होत असल्याच्या कारणावरून बसमधून उतरून घेतले. बस कायनेटीक चौकात गेल्यानंतर फिर्यादीला त्यांच्या गळ्यातील गंठण दिसून आले नाही. दोन महिलांनी गंठण चोरून नेले असल्याचा त्यांचा संशय आहे. त्यांनी कोतवाली पोलिसांना माहिती देत फिर्याद दिली. दरम्यान, सदरच्या दोन महिला बस स्थानकावरील सीसीटीव्हीमध्ये दिसून येत आहेत. पोलीस अधिक तपास करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### नैसर्गिकरित्या वाढेल आयोडीनचे प्रमाण

आयोडिनच्या कमतरतेमुळे विविध आजारांची लागण होते. थायरॉईड ग्रंथीमधून बाहेर पडणारे थायरॉक्सिन हे हॉर्मोन तयार होण्यासाठी आयोडिनची जरुरी असते. याचे दररोजचे आवश्यक प्रमाण १५० मिलिग्रॅम इतके आहे. याच्या अभावाने थायरॉईड गॉयटर नावाचा विकार होतो. म्हणून रुग्ण घाबरून आयोडिनयुक्त मीठ जास्त प्रमाणात खाण्यास सुरुवात करतात. परंतु नैसर्गिक पदार्थांमधूनही आपल्याला आयोडिन भरपूर प्रमाणात मिळते.

## पाककला

### कुटाच्या मिरच्या

**साहित्य :** मिरच्या, धने, मेथीचा रवा, मीठ, साबुदाणा, तीळ, आंबट दही, मिरच्यांच्या मानाने बाकीचे साहित्य घ्यावे.

**कृती :** कुटाच्या मिरच्या करण्याकरिता मिरच्या घ्यावयाच्या, त्या जाड व लांब जातीच्या मिरच्या मिळतात, त्या घ्याव्या. मिरच्यांची डेठे काढून त्यांना मधेच चीर पाडावी. धने व तीळ कुटून घ्यावे. थोडा साबुदाणा भिजवून घ्यावा. दही घेऊन त्यात धन्याची व तिळाची पूड, मेथीचा रवा, साबूदाणा व तीळ घालून कालवावे व चीर पाडून घेतलेल्या मिरच्यांमध्ये हे तयार केलेले कूट भरावे. नंतर मिरच्या वाळवून, भरून ठेवाव्या. जरुरीच्या वेळी तेलात खमंग तळून घ्याव्या.

## वास्तू

### वास्तूयज्ञ का करावा

दर पाच ते दहा वर्षांनी एकदा वास्तुशांतीसारखा वास्तुयज्ञ करावा वास्तु शुद्धीकरण होते. घरात नेहमी गायत्री मंत्रोच्चारण, कुलदेवता व इष्टदेवतांचे स्तोत्र-मंत्र - जप करावेत. प्रत्येक घरात (कुटुंबात) कुलदेवतापूजन, कुलधर्म-कुळाचार नियमितपणे करावा.

## सल्ला

लिंबामधील जास्तीत जास्त रस निघून येण्यासाठी लिंबू प्रथम पाण्यात थोडा वेळ धरावे व त्याचप्रमाणे हाताने चोळून थोडे मऊ करून घ्यावे.

## सौंदर्य

१५ दिवसांतून एकदा मेहंदी डाय करावा. याने केसांचे आरोग्य सुधारते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २० सप्टेंबर २०२४

**तृतीया श्राद्ध, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, अश्विनी २६।४३, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष :** व्यापारिक भागीदारीसाठी उत्तम वेळ. अधिकारांचा योग्य वापर कराल. स्पर्धा, पैजा जिंकू शकाल. लाभ होईल.

**वृषभ :** हितशत्रू डोके वर काढतील. मनावरील दडपण दूर. अनुसंधानातून कार्यक्षेत्रात प्राप्ति योग. दिवस कालच्या इतका आनंदात जाणार नाही.

**मिथुन :** कार्यक्षमता वाढल्याने उत्साह वाढेल. अभीष्टसिद्धी होईल. फायदा होईल. विरोधक करार करतील.

**कर्क :** कामांची प्रशंसा होईल. भागीदारी पक्षात होऊ शकते. कसूर होईल. मनाला प्रसन्नता वाटेल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल.

**सिंह :** रोग, ऋण संबंधी कार्यात विशेष लाभ. उत्तम वाहन सुख. तब्बेतीत सुधारणा. धार्मिक कार्यात वेळ जाईल. मित्रांकडून आर्थिक लाभ होईल.

**कन्या :** जोडीदारा बरोबर तणाव ठेऊ नका. मतभेदांपासून लांब रहा. व्यापार राहील. विवाह योग, घरात शुभ मांगलिक कार्ये.

**तूळ :** धर्म, आध्यात्मात रूचि वाढेल. अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहील. कार्यक्षेत्राचा विकास आणि विस्तार होईल.

**वृश्चिक :** व्यापारात बुद्धिमत्ता, दूरदर्शितेची प्रशंसा होईल. अत्यधिक प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील.

**धनु :** अर्थप्राप्ती झाल्याने खर्चाचे प्रश्न सुटतील. अध्ययनात छान यश. अर्थप्राप्तिचा योग. परिश्रमाने कामाचे शुभ परिणाम येतील.

**मकर :** भागीदारीतून विशेष लाभ. उपजीविकेच्या स्त्रोतातून लाभ होईल, लोकप्रियतेत वृद्धि होईल.

**कुंभ :** काळजीपूर्वक काम करा. कोणतेही काम एखाद्यावर विसंबून राहून करू नका. आरोग्य नरम-गरम राहील. अध्ययनात रूचि वाढेल.

**मीन :** पाठबळ मिळेल. मनाला प्रसन्नता वाटेल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल. मित्रांकडून आर्थिक लाभ होईल. आनंदाची बातमी मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# हसा आणि शतायुषी व्हा!

### गाऊन

लता मंगेशकर कापडाच्या दुकानात खरेदीला गेल्या. त्यांना पाहून विक्रेती भांबावून गेली. त्यांनी विचारले, 'मुली जरा गाऊन दाखवतेस का?'

लाजेने चूर झालेली विक्रेती म्हणाली, 'छे हो माझा आवाज तितकासा चांगला नाहीयं'

# ...चला करू स्पर्धा परीक्षांची तयारी

- ✻ जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष राजीनामा या अधिकाऱ्याकडे देतात - विभागीय आयुक्त
- ✻ पोलिस पाटलाची नियुक्ती या अधिनियमाद्वारे केली जाते - पोलिस अधिनियम १९६७
- ✻ भाटघर धरण या नदीवर बांधलेले आहे - वळवंडी
- ✻ जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षाचे मानधन इतके असते - १६००० रू.

**संदर्भ - 'कॉम्पिटिशन सक्सेस (जनरल नॉलेज) इंग्रजी मासिक**
**मराठी अनुवाद - अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# फिल्मीचक्कर क्र. ११५५ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | | ■ | ■ |
| ■ | | ■ | ५ | | ■ | ६ | ■ |
| ■ | ७ | | ■ | ८ | | | |
| ■ | | ■ | ९ | | ■ | | ■ |
| ■ | | ■ | ■ | | ■ | | ■ |
| ■ | | ■ | १० | | ■ | ११ | १२ |
| १३ | | ■ | | ■ | ■ | १४ | |
| १५ | | ■ | १६ | | ■ | | ■ |

**आडवे शब्द :-** १) 'संगम' चित्रपटाची नायिका ५) ++ दिन नयी रात (चित्रपटाचे नाव) ७) ++ धुपिया (अभिनेत्री) ८) मेरे ++++ (चित्रपटाचे नाव) ९) ++ और शाम (चित्रपटाचे नाव) १०) ++ क्यूं और कहाँ (चित्रपटाचे नाव) ११) ++ फायटर जॉनी (चित्रपटाचे नाव) १३) जंगल मे ++ नाचा किसने देखा किसने देखा (गाणे) १४) फिर वही दिल ++ हूं (चित्रपटाचे नाव) १६) अमिताभ बच्चन, अमृतासिंग, निरुपा रॉय यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** २) संजय दत्त, रवीना टंडन यांचा एक चित्रपट ३) ++ देवीयाँ (चित्रपटाचे नाव) ४) राजा बब्बर, दीपा साही, फारूक शेख, शाहरूखखान यांचा एक चित्रपट ६) संजयखान, हेमामालिनी यांचा एक चित्रपट १०) +++ पैदा करनेवाली की (चित्रपटाचे नाव) १२) नया + + (चित्रपटाचे नाव) १३) ++ डार्लिंग (दिवंगत अभिनेता अजित यांचा खास संवाद)

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** यश म्हणजे अनेक लहान लहान प्रयत्नांची बेरीज व पुनरावृत्ती असते.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### प्राण्यांना तुटलेले अवयव पुन्हा का येतात?

पालीला फटका मारला तर पाल पळून जाते. मात्र बरेचदा असे दिसते की, पालीची शेपूट तुटून मागे राहते आणि ती बराच वेळ वळवळ करते. त्यामुळे पालीवर झडप मारणाऱ्या प्राण्याचे लक्ष त्या शेपटीकडे जाते नि पालीला पळून जायला वेळ मिळतो. काही दिवसांनी पालीला पुन्हा नवीन शेपूट फुटते. याला शास्त्रीय भाषेत 'पुनरुद्भवन' असे म्हणतात. म्हणजे झाडाची फांदी खुडली की तिथून दुसरी फांदी उगवण्याचाच हा प्रकार असतो.

प्राणिसृष्टीत उत्क्रांतीच्या प्राथमिक टप्प्यावर असलेल्या प्राण्यातच हे पुनरुद्भवन घडते. सस्तन प्राण्यात हे घडत नाही, असे आपल्याला वाटते पण ते घडत असते. फरक एवढाच की, आपला तोडलेला अवयव परत उगवत नाही. आपल्या शरीरातले पुनरुद्भवन घडते ते जखमेवर कातडी येणे, कापलेले केस उगवणे या प्रकारचे असते. यातल्या कातडीच्या पुनरुद्भवनाचा फायदा घेऊन प्लॅस्टिक सर्जरी केली जाते.

## सुधारण्याची संधी

एका गावात एक अट्टल गुन्हेगार राहत होता. त्याची प्रतिमा चांगली नव्हती. त्याला अनेक गुन्ह्यांमुळे शिक्षा झालेली होती. जो तो त्याला वचकून असे. गावातले लोक त्याच्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करीत असत.

गावातला कुविख्यात माणूस असूनही तो श्रीमंत होता. त्याच्याकडे नोकरचाकरांचा राबता होता. धनधान्याची कमतरता नव्हती. तरीही लोकांच्या मनात त्याच्याबद्दल जराही आदर नव्हता. गावातल्या लग्नकार्यात, सभा-समारंभात त्याला बोलावले जात नसे. थोडक्यात, त्याच्यावर सर्वांनी बहिष्कारच टाकलेला होता. त्या माणसाला देखील ही गोष्ट पुरेपूर माहीत होती. परंतु तो कधी बोलून दाखवत नसे किंवा आपल्याला कुणी समारंभात किंवा लग्नात बोलावले नाही तर रागवत देखील नसे.

एकदा त्या गावात गावकऱ्यांनी मोठ्या श्रीरामकथेचे आयोजन केले. त्यासाठी काशीहून थोर संतांना प्रवचनासाठी बोलावण्यात आले. काशीच्या संतांच्या अमृतवाणीने सारे भाविक तृप्त झाले. भक्तीचा परमोच्च बिंदू त्यांनी गाठला होता. गावातल्या त्या गुन्हेगार माणसालादेखील या प्रवचनांची माहिती समजली होती. त्यानेही त्या कथांचा लाभ घेतला होता. श्रीरामकथेच्या समाप्तीच्या आधी गावातल्या त्या गुन्हेगार माणसाने महाराजांना आपल्या घरी भोजनाचे आमंत्रण दिले. गावकऱ्यांनी त्या माणसाबद्दल सारी माहिती महाराजांना दिली होती. तथापि महाराजांनी त्याच्या घरी भोजनाला जाण्याचा निर्णय घेतला. आपल्याबरोबर आणखीन ४ गावकरी नेले. सर्वांना त्याने छान जेवू घातले. महाराजांनी त्याला उपदेशाच्या चार गोष्टी सांगितल्या.

परतल्यावर महाराज म्हणाले, 'तुम्ही त्या गुन्हेगार माणसाला दूर लोटता हे योग्य नाही. कदाचित त्याला सुधारायचे असेल. त्याकरिता त्याच्याजवळ जाणे, त्याच्यावर चांगले संस्कार करणे हे महत्त्वाचे असते. तुम्हीही त्याला जवळ करा.' गावकऱ्यांनी त्याला सुधारण्याची संधी दिली. पुढे त्याने गुन्हेगारी सोडली.

तात्पर्य : काही माणसांना चांगले होण्याची संधी एकदा तरी दिली पाहिजे.

# जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



हम अचानक ही सोचना शुरू कर देते हैं कि जीवन का अभिप्राय क्या है, हम कौन है और मौत के बाद हमारे साथ क्या होता है। यह परेशान करती धीमी आवाज़ समय के साथ तेज़ हो जाती है। हमारे अन्दर इन प्रश्नों की खोज करने के लिए एक खिंचाव पैदा हो जाता है। हमारे दिलों में यह खिंचाव खुद प्रभु पैदा करता है, ताकि वह हमें अपनी ओ. सकें। जिस क्षण उसे अवसर मिलता है, जिस क्षण वह देखता है। इस संसार और इसके आकर्षणों की वास्तविकता के बारे में कछ। है, वह उस समय का लाभ उठाता है।

वह हमारे भीतर वह बीज डालन है, जो जीवन के रहस्यों को हल करने के लिए हमें प्रेरित करता उसका प्रेम हमारे भीतर कार्य करना शुरू कर देता है और हममें प्रभा जानने की इच्छा जागृत हो जाती है। यह हमारे लिए एक महान दिवस होता है, जब हम अपने सच्चे पिता को जानने की अपनी आत्मा की पुकार को सुनने लगते हैं।

जब हम इस ध्वनि की ओर अधिक ध्यान देते हैं जो कि हमें अपने घर की ओर खींचती है, तो प्रभु हमें ऐसे स्थान पर पहुंचा देता है जहाँ कोई महापुरुष रहता हो और वह हमें प्रभु की ओर जाने वाले रास्ते पर डाल देता है। प्रभु हमें एक सत्गुरु के पास पहुंचा देता है, जो हमें हमारे असली स्वरूप के बारे में समझाता है कि हम आत्मा हैं और प्रभु के अंश हैं।

वह हमें ऐसा तरीका बताता है, जिसके द्वारा हम इस भौतिक जगत से ऊपर उठ सकते हैं और स्वयं देख सकते हैं कि हम प्रभु के अंश हैं। वह हमें सिखाता है कि हम भजन-सुमिरन कैसे करें और अंतर्मुख कैसे हों। वह हमें 'नाम' या नी ज्योति व श्रुति की धारा से जोड़ देता है, जो कि प्रभु से तब उत्पन्न हुई थी, जब उसने इस सृष्टि को पैदा किया था। यही धारा उसकी ओर वापिस भी जाती है। यह एक ऐसी धारा है जो प्रभ की अंश है, सम्पूर्ण ज्योति, सम्पूर्ण संगीत व सम्पूर्ण प्रेम है। जब आत्मा। भजन-सुमिरन करती है और इस धारा के सम्पर्क में आती है तो यह एक परिपूर्णता और आनन्द का अनुभव करती है क्योंकि यह उसी न की बनी है, जिसकी यह धारा बनी है।

हम ज्योति व श्रुति की धारा के सम्पर्क में आकर, किसी भी भौतिक मनोरंजन से मिलने वाली पी और संतोष से कहीं अधिक खुशी और संतोष का अनुभव करते । सम्पर्क में प्रेम की ऐसी शक्ति है, जो कि हमारा ध्यान प्रभ की देती है। तब हम पाते हैं कि भौतिक सुख अपना आकर्षण खोना शुरू कर देते हैं। हमें इस संसार में किसी भी चीज़ से इतनी संतुष्टि नहीं मिलती, जितनी हमें भजन-सुमिरन में ज्योति व श्रुति के सम्पर्क में आने पर मिलती है। आत्मा और अधिक परमानन्द की अभिलाषा करती है और आन्तरिक ज्योति व श्रुति में और अधिक समाहित हो जाती है। तब यह भौतिक जगत से ऊपर उठकर एवं शब्द धारा पर सवार होकर असीम सौंदर्य से भरे आंतरिक मंडलों में उड़ना आरम्भ कर देती है।

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

# शुद्ध जीवन जीने के मंत्र (शांति)

जिसको भी बच्चा देखता है उसकी मासूमियत सबको आकर्षित करती है तथा सब के दर्द दुख मिटा देती है। आँखों में कोई छल कपट नहीं होता। बच्चा जिस भी चीज को देखता है उसी के बारे जानने को उत्सुक रहता है। ८ से ११ वर्ष की उम्र तक पवित्रता बच्चे के कंठ में आ जाती है। बच्चे की आवाज बहत सुरीली होती है। जब लड़कों की आवाज बदल जाती है। पहले लड़के एवं लड़की की आवाज एक जैसी होती है। लड़कों की आवाज जब भारी हो जाती है तो समझो कि पवित्रता गले में पहुँच गई है। विपरीत लिंग का आकर्षण होने लगता है। १२ से १६ वर्ष की आयु तक पवित्रता मेरुदंड से होती हुई जननेइन्द्रिय में पहुँच जाती है। जब लड़कियों को मासिक आने लगता है। लड़को पर एक विशेष चमक एवं फुर्ती आ जाती है। १६ से २४ वर्ष की आयु तक पवित्रता मनुष्य के सारे शरीर में फैल जाती है। इस उम्र में पवित्रता बच्चों को आकर्षित करती है। १ (एक) से १२ वर्षों तक पवित्रता को पीनियल ग्रंथी अपने नियंत्रण में रखती है। बच्चे को अपवित्रता परेशान नहीं करती। क्योंकि यह ग्रंथी उसको नियंत्रित कर लेती है। १२वें वर्ष में पवित्रता को पीचुटरी ग्रंथी नियंत्रित करती है। यह ग्रंथी जबरदस्ती पवित्रता को नियंत्रित नहीं करती। वह तो बस उससे सम्बन्धित स्त्राव पैदा करती है। बच्चे को अपने विवेक व समझ से अपवित्रता को नियंत्रित करना होता है। पृथ्वी के दो ध्रुव है, उत्तरी ध्रुव एवंदक्षिणी ध्रुव। ऐसे ही हर मनुष्य के दो शक्ति केन्द्र हैं, मस्तिष्क एवं जननेइन्द्रिय। मस्तिष्क को उत्तरी ध्रुव कहते हैं और जननेइन्द्रिय को दक्षिणी ध्रुव कहते हैं। पृथ्वी के दक्षिणी ध्रुव जोकि ५०-६० किलोमीटर का इलाका है, कहते हैं वहाँ जो भी जाता है उसमें प्यार आ जाता है। हिंसक प्राणी भी वहाँ प्यार करने लगते हैं। वैर भाव भूल जाता है। ऐसा इसलिये होता है कि वहाँ से धरती में से प्यार की तरंगे निकलती है।

ऐसे ही मनुष्य का दक्षिणी ध्रुव अर्थात् जननेइन्द्रिय से हर समय तरंगे निकलती रहती है जोकि प्रेम के आकर्षण की होती हैं। विपरीत लिंग से आकर्षण होने लगता है। आज लगभग सारा संसार ही इस प्यार के कारण ही अपवित्रता की ओर आकर्षित होकर भटक रहा है। ये ऊर्जा मेरुदंड के सबसे नीचे वाले मनके में नियंत्रित होती है। शरीर की सारी कोशिकायें आकर्षण सम्बन्धित शक्ति यहाँ पहुँचा देती है। इसलिये जो व्यक्ति जितना ज्यादा अपवित्रता के बारे सोचता है उतना ही ज्यादा इस मूल आधार चक्र के द्वारा कर्मइन्द्रिय में खिंचाव महसूस करता है। इसी चक्र में कुंडलनी शक्ति भी रहती है। जब मनुष्य कामुक चिंतन नहीं करता और ध्यान का अभ्यास करता है तो यह शक्ति ऊपर उठती है जो मस्तिष्क में पहुँच कर असम्भव कार्य करने लगती है।

**अपवित्रता** - अपवित्रता का कारण हर कोशिका में उपस्थित २३वां गुणसूत्र का जोड़ा है। यदि यह जोड़ा निष्क्रिय कर दिया जाये तो मनुष्य में अपवित्र विचार उठेंगे ही नहीं। इस जोड़े को निष्क्रिय करने के लिये ही हम योग लगाते हैं। जब हमारा मन भगवान से लगता है तो भगवान से ऐसी शक्ति प्राप्त होती है जिससे इस कोशिका के वासना के सूत्र काम करना बंद कर देते हैं। यह सूत्र तब आकर्षित नहीं होंगे यदि कम से कम अढ़ाई घंटे हर दिन का योग होगा। इन्हें जड़ से खत्म करने के लिये आठ घंटे का योग होना चाहिये। सम्पूर्णता क्या है? सम्पूर्णता अर्थात् हमें वासना का संकल्प तक न आये।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

खरतर याला वनस्पती तूप का म्हणतात, असा मला प्रश्न पडतो. कारण हे तूप अजिबात नाही. वनस्पती तूप म्हटल्यावर सर्वसामान्यांना अगदी ते नैसर्गिकच तूप वाटते, म्हणून उपवासाच्या दिवशीही अन्नपदार्थ शिजविण्यासाठी किंवा तळण्यासाठी याचा वापर करतात. परंतु हे आरोग्यास घातक आहे. हे तूप नैसर्गिक नसून, खाद्य तेलापासून रासायनिक प्रक्रियेने बनविल हॅड्रोजनेटेड ऑईल्स किंवा वनस्पती तूप असे म्हणतात.

**वनस्पती तूप बनविण्याची प्रक्रिया :**

सरकी तेल, रेपसीड तेल, मोहडा तेल, सालसीड तेल, मोहरी तेल, धुपा तेल, सोयाबीन तेल, भात-तूस तेल, मका तेल, फुलवारा तेल अशा अनेक प्रकारच्या तेलांपासून हे अनैसर्गिक कृत्रिम घनीभूत तूप बनविले जाते. या तेलामध्ये सायट्रिक ॲसिड घालून तापवितात. नंतर कॉस्टिक सोड्याने त्याला धुऊन त्याचा रंग पांढरा केला जातो. अजून शुभ्रपणा येण्यासाठी आम्लमाती व कोळशाच्या सान्निध्यात पुन्हा तेल तापविली जातात. त्यानंतर ब्लीचिंग करून शुभ्रपणा वाढविला जातो. या प्रक्रियेमुळे तेलांमधील आवश्यक असलेली सर्व नैसर्गिक मूलद्रव्ये नष्ट होतात. या तेलांना घट्टपणा येण्यासाठी यामध्ये हायड्रोजन गॅस सोडतात. या प्रक्रियेसाठी निकेल धातू वापरला जातो, जो आरोग्यास अतिशय घातक असतो. यानंतर कृत्रिम घनीभूत अनैसर्गिक तूप बनते, परंतु याचा वास नष्ट करण्यासाठी पुन्हा रासायनिक प्रक्रिया करून हे तूप ४ ते ५ तासांपर्यंत २४० अंश ते २६० अंश सेंटीग्रेडला तापवले जाते व सर्वांत शेवटी अशा पद्धतीने अनैसर्गिक वनस्पती तूप बनते.

**गुणधर्म :**

वरील पद्धतीने अनैसर्गिक वनस्पती तूप बनल्यानंतर त्यातील सर्व पोषक घटक नष्ट होतात व उरते ते फक्त निःसत्त्व घन तूप! या तुपात कृत्रिम पद्धतीने जीवनसत्त्व 'अ' व 'ड' सर्वात शेवटी मिसळले जाते. परंतु हे तुप पचनास जड झाल्या मुळे शरीरावर त्याचा अतिरिक्त भार पडतो. पर्यायाने कृत्रिम जीवनसत्त्वांचा काहीही उपयोग होत नाही. हे तूप म्हणजे एकप्रकारे संपृक्त, स्निग्ध पदार्थ की जो सामान्य तापमानावर घन स्वरूपात राहतो. हे तूप सामान्य तापमानामध्ये घन स्वरूपात राहिल्यामुळे सेवन केल्यानंतर शरीरात देखील रक्तवाहिन्यांमध्ये घन स्वरुपात राहते.

तुप देखील रक्तवाहिन्यांमध्ये घन स्वरूपात राहते. रक्तवाहिन्यांच्या आतील आवरणाला हे तूप चिकटून राहते. त्यामुळे रक्तपुरवठा सुरळीत राहण्यास अडथळा निर्माण होतो व पर्यायाने उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, हृदयविकार असे आजार जडतात.

या वनस्पती तुपामुळे एलडीएल हे खराब कोलेस्टेरॉल वाढते, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका निर्माण होतो. म्हणून वनस्पती तूप आहारातून पूर्णपणे वर्ज्य करायलाच हवे. वनस्पती तुपापासून बनविलेले पदार्थ सुद्धा खाऊ नयेत.

**उदाहरणार्थ :** बिस्किट्स, चॉकलेट्स, नानकटाई, केक, खारी, पाव, ब्रेड हे सर्व पदार्थ आहारातून वर्ज्य करावेत. हे तूप पचनास जड असल्यामुळे व शरीरास आत चिकटून राहत असल्यामुळे आम्लपित्त, अपचन, गॅसेस इत्यादी तक्रारी लगेचच सुरू होतात. उपवासाच्या दिवशी खरेतर सात्त्विक फलाहार घेणे गरजेचे असते. परंतु असे न होता जड वनस्पती तूप वापरून वेफर्स, पापड्या यांचे तळण केले जाते. तसेच याच तुपात साबुदाणा खिचडी, वडे केले जातात. असे खाणे शरीरास अतिशय घातक आहे. यापेक्षा उपवास न केलेलाच बरा!

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# डॉ.वंदना सिरसाठ-गवळी यांना विधी शाखेत पी. एच.डी प्रदान



नगर - येथील डॉ. वंदना सिरसाठ-गवळी यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर येथून विधी शाखेतून महिला आरक्षण विशेष संदर्भात, भारतीय संविधाना अंतर्गत सामाजिक न्याय या विषयात पी. एच डी प्रदान करण्यात आली आहे. त्यांना डॉ. एस. के. हिगोले यांचे मार्गदर्शन लाभले.

डॉ. वंदना भिवसन सिरसाठ (राजेश्री लक्ष्मीकांत गवळी) या न्यू लॉ कॉलेज अहमदनगर येथे सहायक प्राध्यापक म्हणुन कार्यरत आहेत. त्या नगर येथील शिल्पकार लक्ष्मीकांत गवळी यांच्या पत्नी आहेत.

त्यांचा यशाबद्दल मुकुंदराव गवळी (सासरे), सिव्हिल इंजि. अनिल गवळी, ॲड. श्रीकांत गवळी, ॲड. चंद्रकांत पाटिल, डॉ. रोहिणी अनिल गवळी, प्रा. गंगाधर राऊत (बीड), डॉ. संजय बोराडे (ठाणे), ॲड. अरुण सिरसाठ (माहोरा), मामा अंबादास तुपे (जालना पोलिस) तसेच न्यू लॉ कॉलेज यांनी अभिनंदन केले.



पिंजारगल्ली येथील रिठा मस्जिद ट्रस्टचा महानगरपालिकेने वाणिज्य दराप्रमाणे आकारलेला कर व त्यावर लावलेल्या ११ लाख २६ हजार रु. धार्मिक स्थळांना येणारा टॅक्स शिवसेना माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी पाठपुरावा करुन कमी करुन दिल्याबद्दल त्यांचा मस्जिद ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ट्रस्टी गफुरभाई, फय्याजभाई, जाफरभाई, हाजी गुलाम रइसूल, हाजी इस्माईल, सलीमभाई जरीवाला, अल्तमेश जरीवाला, गफ्फार मन्सुरी, कदीर फौजी, अमजद दंडोती व रियाजभाई आदी.


# नाकाचं हाड वाढलंय?

माणसाच्या कवटीच्या तळापासून (Skull base) नाकाच्या शेंड्यापर्यंत, नाकाच्या पोकळीचे उजव्या आणि डाव्या भागात विभाजन करतो ते म्हणजे नाकाचं हाड (Nasal Septum). जन्मत: नाकाचं हाड कूर्चामय (cartilagenous) असतं. पुढे जसं वय वाढत जातं, त्यानुसार त्यात कॅल्शियम जमा होऊन त्याचं हाडात रूपांतर होतं. साडेसोळा वर्षाच्या वयात नाकाच्या हाडाची वाढ पूर्ण होते. पूर्ण वाढ झालेलं नाकाचं हाड म्हणजे ७० टक्के हाड + ३० टक्के कूर्चा यांचे संयोग होय.

साधारणत: ७५ टक्के सामान्य लोकांमध्ये नाकाचे हाड विविध प्रमाणात वाकडं असतं. बऱ्याच जणांना त्याची कल्पनाही नसते. म्हणजे थोडक्यात उरलेल्या २५ टक्के लोकांमध्येच हे हाड सरळ असतं. या वाकड्या हाडालाच सामान्यत: नाकाचं हाड वाढणं (DNS - Deviated Nasal Septum) असं संबोधलं जातं. ही वाढ कधी उजव्या, डाव्या किंवा दोन्ही बाजूला (Sinusoid) असते.

नाकाचं हाड वाढण्याच्या कारणात गर्भावस्थेत तसंच जन्माच्या वेळी नाकाच्या कूर्चामयी हाडावर दाब आल्यामुळे त्या थोडा बाक येतो. हाच पुढे वाढत जाऊन त्रासदायक रूप धारण करतो. तसंच नाकाला मार लागल्यामुळे नाकाचं हाड फ्रॅक्चर होऊन वाकणं आणि काही जन्मजात व्याधी (congenital) ही आणखी काही कारणं होत. जन्मजात व्याधी म्हणजे मार्फन्स सिंड्रोम, होमोसिस्टनि-युरिया ही होय.

नाकाचं हाड वाढलेल्या काही व्यक्तींमध्ये वारंवार नाक चोंदणं, रात्री त्याची तीव्रता वाढणं, वारंवार सर्दी होणं, ती पिकणं (rhino-sinusitis), शिंका येणं, नाकातून रक्त येणं, चेहरा/डोकं दुखी, घोरणं, नाकाला कोरड पडणं तसंच घाणेंद्रियाच्या तक्रारी दिसून येतात. नाकाचं हाड तीव्र स्वरूपात वाढलेलं असल्यास ते बाकाच्या ठेवणीला बदलतात, त्यामुळे नाक विद्रुप दिसू शकतं.




बऱ्याच रूग्णांच्या नाकाचं हाड खूपच वाढलेलं असूनही काहीही त्रास नसल्याचं अनेकवेळा आढळून येतं. अशावेळी त्यांच्या नाकातील असमतोल (asymmetry) रचना त्यांना पूरक (compensated) झालेली असते. नाकाचं हाड वाढलेल्या रूग्णांना त्रास झाल्यास नाकातील सूज कमी करण्यासंबंधीची औषधं (Decongestants), ॲलर्जीरोधक (anti-histaminics) तसंच नाकातील थेंब/फवारा इत्यादींनी आराम पडतो.

वारंवार त्रास झाल्यास नाकाच्या हाडाचं ऑपरेशन करून ते सरळ करता येतं. त्यामुळे रूग्णाच्या समस्येत निश्चित आराम पडतो. आपल्या चेहऱ्याच्या वाढीला नाकाच्या हाडाची वाढ पूरक असते. आपल्या चेहऱ्याच्या हाडांची (तसेच नाकाच्या हाडांची) वाढ ही साधारणत: वयाच्या साडेसोळा वर्षापर्यंत होत असल्यामुळे तोपर्यंत नाकाच्या हाडाचं ऑपरेशन करण्याचा सल्ला सर्जन देत नाहीत.

### समज-गैरसमज

नाकाच्या हाडाचं ऑपरेशन केल्यानंतर ते पुन्हा वाढतं?

आपल्या शरीराच्या प्रत्येक हाडाचं वाढायचं वय असतं. तसंच नाकाच्या हाडाची वाढ देखील साडेसोळा वर्षांनंतर होत नाही. त्यामुळे ते पुन्हा वाढण्याची शक्यता नसते.

नाकाचं ऑपरेशन लहान मुलांमध्येही करता येतात?

नाकाच्या व्याधीमुळे त्रस्त असलेल्या मुलांची नाकाच्या हाडांचे ऑपरेशन टाळावं. त्यामुळे चेहऱ्याच्या हाडांच्या वाढीवर परिणाम होऊन चेहऱ्याचं विद्रुप दिव्यांग होऊ शकतं. ते आयुष्यभर पुरतं. कधीकधी या त्रस्त मुलांच्या शारीरिक (खेळताना दम लागतो म्हणून खेळ सोडणं, अभ्यासात लक्ष न लागणं तसंच झोपेत घोरणं इ.) वाढीवर परिणाम होत असल्यास छोटे ऑपरेशन करून नाक मोकळं केलं जातं. अशा मुलांना वयाच्या पुढच्या टप्प्यात नाकाच्या हाडाचं योग्य ऑपरेशन करण्याची गरज पडू शकते.

श्वसनाच्या ॲलर्जी असलेल्या रूग्णांना नाकाच्या हाडाचे ऑपरेशनने फरक पडतो?

श्वसनाची ॲलर्जी नाकातल्या/ सायनसेसच्या संपूर्ण त्वचेत भिनलेली असते. फक्त नाकाचे हाड सरळ करून त्यात फारसा फरक पडत नाही. त्यामुळे शस्त्रक्रिया करू नये.

नाकावर उंचवटा (Dorsal hump) असला म्हणजे नाकाचं हाड वाढलेलं असतं?

असं काहीही नसतं.

नाकाचं हाड वाढणं यावर डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपचार करणं गरजेचं असतं. त्यामुळे गैरसमजातून व्याधीकडे दुर्लक्ष करू नये.

**-डॉ. अतुल बाबासाहेब तुपे,**
**आनंदऋषीजी हॉस्पिटल, नगर,**
**ओपीडी: सकाळी १० ते १, सायंकाळी ६ ते ८**

# महिलांना फ्लॉवर मेकिंग व पूजा थाळी डेकोरेशनचे प्रशिक्षण

## प्रयास ग्रुप व नम्रता दादी नानी ग्रुपचा उपक्रम, गरबा नृत्याचे महिलांनी गिरवले धडे

नगर - सावेडी येथे प्रयास ग्रुप व नम्रता दादी नानी ग्रुपच्या वतीने महिलांना फ्लॉवर मेकिंग व पूजा थाळी डेकोरेशन प्रशिक्षण देण्यात आले. तर नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर महिलांनी गरबा नृत्याचे धडे गिरवले.

गुलमोहर रोड, येथील कमलाबाई नवले सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात दिपाली देऊतकर यांनी कागद, चमकी, प्लॅस्टिक आदी विविध वस्तूंपासून फुले बनविण्याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. यावेळी दादी-नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, प्रयास ग्रुपचे अध्यक्ष रजनी भंडारी, सचिव हिरा शहापुरे, छाया राजपूत, संस्थापिका अलकाताई मुंदडा, मेघना मुनोत, लता कांबळे, अर्चना बोरुडे, शकुंतला जाधव, शशिकला झरेकर, शोभा कानडे आदींसह महिला उपस्थित होत्या.

योगेश शिंगवी यांनी उपस्थित महिलांना पारंपारिक गरबा नृत्याचे प्रशिक्षण दिले. महिलांनी देखील गरबा नृत्यावर ठेका धरला होता. प्रास्ताविकात अलकाताई मुंदडा यांनी वर्षभर महिलांच्या आरोग्यासह कला-गुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती दिली.

स्वागत जयाताई गायकवाड यांनी केले. महिलांसाठी यावेळी विविध मनोरंजनात्मक व बौध्दिक स्पर्धा रंगली होती. अनुक्रमे अनुराधा पलटणे, सीमा शेळके, भारती भंडारी, मीनाक्षी जाधव, आशा कांबळे आदींनी बक्षीसे मिळवली.

वैशाली उत्तेकर यांच्या वतीने विजेत्या महिलांना बक्षीसे देण्यात आली.



प्रयास ग्रुप व नम्रता दादी, नानी ग्रुपतर्फे गरबा नृत्याचे धडे गिरवताना महिला. तसेच फ्लॉवर मेकींग व पूजा थाळी डेकोरेशनचे प्रशिक्षण देताना दिपाली देऊतकर. समवेत दोन्ही ग्रुपच्या पदाधिकारी महिला.

# माळी महासंघ जिल्हा महासचिवपदी विवेक फुलसौंदर

## जिल्हा युवक अध्यक्षपदी यश भांबरकर, शहर जिल्हाध्यक्षपदी मनोज फुलसौंदर







नगर - माळी महासंघ जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये अहमदनगर जिल्हा महासचिवपदी विवेक फुलसौंदर, जिल्हा युवक अध्यक्षपदी यश भांबरकर तर शहर जिल्हाध्यक्षपदी मनोज फुलसौंदर यांची निवड करण्यात आली.

महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश ठाकरे व प्रदेशाध्यक्ष अरुण तिखे व शिक्षक आघाडी प्रदेश अध्यक्ष तांबे सर, सहकार आघाडी प्रदेश उपाध्यक्ष राम पानमळकर यांच्या मार्गदर्शनानुसार पदाधिकारी नियुक्त्या करण्यात आल्या. यावेळी जिल्हाध्यक्ष भूषण भुजबळ यांनी नियुक्ती पत्र दिले.

याप्रसंगी नंदकुमार नेमाने, गणेश धाडगे, तुषार फुलारी, सुभाष गोंधळे, संदीप दळवी, राजेंद्र बोरुडे, योगेश गाडिलकर, संजय राऊत, गोरक्षनाथ गाडेकर, आकाश फुले, जयश्री व्यवहारे, सुवर्णा शेलार, भगवान हजारे, अभिजित बोरुडे, विकास रासकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

नियुक्त पदाधिकारी यांनी माळी महासंघ संघटनेच्या वाढीसाठी व समाजकार्यासाठी सदैव तत्पर असल्याचे सांगितले.



डॉ. शरद कोलते स्कूलमधील शिक्षकांचा लायन्स क्लब ऑफ मिलेनियम तर्फे सन्मान करण्यात आला. त्याप्रसंगी विद्यार्थ्यांना क्लबच्यावतीने वृक्ष वाटप करण्यात आले.

# डॉ.शरद कोलते स्कूलच्या सर्व शिक्षकांचा सन्मान

## लायन्स क्लब ऑफ मिलेनियमचा उपक्रम

नगर - शिक्षक हा भविष्यातील पिढी घडवण्याचे काम करतो त्यामुळे त्यांचा योग्य तो सन्मान करने हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे असे प्रतिपादन लायन्स क्लब ऑफ मिलेनियमचे अध्यक्ष डॉ. सुदर्शन गोरे यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. शरद कोलते इंग्लिश मिडीयम स्कूलच्या सर्व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव विजय शिंदे उपस्थित होते.

डॉ. गोरे यांनी मागील भेटीत शाळेचे सुरु असलेले काम व विद्यार्थ्यांची प्रगती पाहिल्यानंतर ग्रामीण भागात असलेल्या शाळेत शिक्षक घेत असलेली मेहनत पाहून प्रभावित झाले. त्यातूनच त्यांनी लायन्स क्लब च्या माध्यमातून या सर्व शिक्षकांचा प्रमाणपत्र व पुष्प देऊन सन्मान केला. यात शिक्षिका सुनिता तनपुरे, रेश्मा शेख, कीर्ती मगर, स्वाती वायकर, निकिता तनपुरे, निकिता गुंड, ईश्वर तनपुरे यांचा समावेश आहे. यावेळी क्लबच्या वतीने सर्व विद्यार्थांना एक वृक्ष वाटप करण्यात आले व लागवड करण्याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नियोजन ईश्वर तनपुरे यांनी केले.

# 'फिरोदिया शिवाजीयन्स'च्यावतीने आयोजित इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेला नगरमध्ये प्रारंभ; पहिल्या सामन्यात तक्षिला, आठरे पाटील, प्रवरा पब्लिक व ऊर्जा गुरुकुल स्कूलचे संघ विजयी




फिरोदिया शिवाजीयन्सच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाले.

नगर - फिरोदिया शिवाजीयन्सच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धा २०२४ चे १८ सप्टेंबरपासून प्रारंभ झाले असून, अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर फुटबॉलचा थरार रंगला आहे. स्पर्धेच्या पहिल्याच दिवसापासून शालेय खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

या स्पर्धेचे उद्घाटन अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाले. यावेळी राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी, अहमदनगर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रज्ज़ाक सय्यद, नोएल पारधे, डॉ. दिलीप भालसिंग, डॉ. घुले, सॅव्हिओ वेगास, फुटबॉल असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालीद सय्यद, जोगासिंह मीनहास, सचिव रॉनप फर्नांडिस, सहसचिव विक्टर जोसेफ, खजिनदार ऋषपालसिंह परमार, सहखजिनदार रणबिरसिंह परमार, कार्यकारिणी सदस्य राजू पाटोळे, पल्लवी सैंदाणे, जेव्हिअर स्वामी, युनिटी क्लबचे राजेश चौहान, फिरोदिया शिवाजीयन्स कमिटीचे सचिन पाथरे, राजेश अँथनी, जॉय जोसेफ, अभिषेक सोनवणे आदींसह खेळाडू उपस्थित होते.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, फुटबॉल वाढविण्यासाठी ग्रासरूटवर काम करणे आवश्यक आहे. मैदानावर खेळाडू आणण्यासाठी जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न सुरु आहे. फुटबॉल प्रशिक्षण व स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंना प्रोत्साहन दिले जात आहे. शहरात फुटबॉल हा मुख्य खेळ बनला असून, स्पर्धेत खेळाडूंचा उत्साह दिसून येत आहे. खेळाडूंनीही या खेळाकडे करिअर म्हणून पहावे. स्पर्धेत हरणारा एक दिवस सातत्य ठेवून जिंकतो, त्यामुळे पराभवाने निराश न होता प्रयत्न करण्याचे त्यांनी आवाहन केले. तर या स्पर्धेसाठी दरवर्षी मैदान उपलब्ध करुन देत असल्याबद्दल अहमदनगर महाविद्यालयाचे आभार मानले.

मनोज वाळवेकर म्हणाले की, फिरोदिया शिवाजीयन्सच्या माध्यमातून फुटबॉल खेळाडू घडविण्याचे काम केले जात आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून त्यांना प्रोत्साहन दिले जात आहे. दरवर्षी ही स्पर्धा रंगतदार होत असून, खेळाडूंना आपले कौशल्य दाखवता येते. या स्पर्धेनंतर लवकरच महाराष्ट्र युथ लीग मध्ये राज्यातील ८ नामांकित संघ उतरणार आहे. यामध्ये फिरोदिया शिवाजीयन्स संघाचा देखील समावेश असणार आहे. खेळाडूंना प्रोत्साहन देऊन फुटबॉल वाढविण्याचे काम सुरु असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उमेश परदेशी यांनी अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर फुटबॉल खेळताना घडलो असल्याचे सांगून, आपल्या खेळाडू जीवनातील अनुभव विशद केले.

फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धा १५ दिवस रंगणार आहे. यामध्ये शहरासह जिल्ह्यातील एकूण ३२ शालेय संघानी सहभाग नोंदवला आहे. स्पर्धेचे हे सहावे वर्ष असून, ही स्पर्धा १२, १४ व १६ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये होणार आहे. तर १७ वर्षा खालील मुलींचे संघ या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. ही स्पर्धा लीग पद्धतीने खेळविण्यात येत आहे.

प्रारंभी उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते मैदान पूजनानंतर आकाशात फुगे सोडून व फुटबॉलला किक मारुन या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. पहिल्याच दिवशी झालेल्या सामन्यात तक्षिला स्कूल, आठरे पाटील स्कूल, प्रवरा पब्लिक स्कूल, ऊर्जा गुरुकुल संघाने विजय मिळवला.

बुधवारी सकाळच्या सत्रात १४ वर्षे वयोगटातील तक्षिला स्कूल विरुध्द अशोकभाऊ फिरोदिया स्कूलच्या सामन्यात २-० गोलने तक्षिला स्कूलचा संघ विजयी झाला. श्री साई विरुध्द आठरे पाटील स्कूलच्या सामन्यात आठरे पाटील स्कूलने जोरदार खेळी करुन तब्बल एकापाठोपाठ १४ गोल करुन श्री साई स्कूल संघाचा धुव्वा उडवला. यामध्ये आठरे पाटील स्कूलने विक्रमी गोलने एकहाती विजय संपादन केले.

दुपारच्या सत्रात १२ वर्षे वयोगटात प्रवरा पब्लिक स्कूल विरुध्द आर्मी पब्लिक स्कूलचा सामना रंगला होता. यामध्ये प्रवरा पब्लिक स्कूलने ४-० गोलने विजय मिळवला. १४ वर्षे वयोगटात प्रियदर्शनी पब्लिक स्कूल विरुध्द ऊर्जा गुरुकुल मध्ये झालेल्या सामन्यात ०-२ गोलने ऊर्जा गुरुकुल संघाने विजय मिळवला. १२ वर्षे वयोगटात ऑक्झिलियम स्कूल विरुध्द प्रवरा पब्लिक स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात ०-६ गोलने प्रवरा पब्लिक स्कूलने दणदणीत विजय संपादन केले.

# रोटरी पीस कौन्सीलींग व हिलिंग सेंटर समाजासाठी वरदान ठरेल

## प्रमोद पारिख यांचे प्रतिपादन; शांतता सप्ताहाची सुरूवात

नगर - शांतता निर्माण करणे हा रोटरीचा पहिला उद्देश आहे. संयुक्त राष्ट्रामध्येही रोटरी शांततेचा आग्रह धरते. अहमदनगर क्लबच्या या रोटरी कौन्सींलींग ॲन्ड हिलिंग सेंटर द्वारे नक्कीच समाजाला खुप फायदा होईल. आज समाजामधील व्यक्ती व्यक्ती मधला संवाद हरवत चालला आहे. अनेक प्रकारचे गैर समज, वादावादी, अपेक्षा भंग या मुळे नाते संबंधात दरी निर्माण होत आहे. घटस्फोटाचे, आत्महत्याचे कोर्टात हेवेदावेचे केसेस वाढत चालले आहे यासाठी रोटरी पीस कौन्सीलींग व हिलींग सेंटर समाजाला वरदान ठरेल असे प्रमोद पारीख म्हणाले.

येथील रोटरी क्लब ऑफ अहमदनगर आयोजित रोटरी शांतता सप्ताहाची सुरूवात झाली असून या निमित्याने रोटरी पीस कौन्सीलींग सेंटरचा शुभारंभ माजी प्रांतपाल प्रमोद पारिख यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. आराधना चौधरी, उपप्रांतपाल प्रसन्न खाजगीवाले, शांतता सप्ताहाच्या मार्गदर्शक डॉ. सुधा कांकरिया, अध्यक्ष नितिन थाडे, सचिव सुभाष गर्जे उपस्थित होते.

शांतता सप्ताहाच्या मार्गदर्शक डॉ. सुधा कांकरिया यांनी सदर सप्ताहाचा उद्देश व कार्यप्रणाली स्पष्ट करतांना सांगितले की आज समाजामध्ये अशांतता, अस्थिरता, अजारकता, अस्वस्थता, अनाचार, पापाचार वाढीस लागलेला दिसत आहे. यातुन बाहेर येण्यासाठी व शांततेची सुरूवात स्वत:पासुन करण्यासाठी सदर सप्ताहाचे आयोजन केले आहे.

१६ ते २१ सप्टेंबर या दरम्यानच्या सप्ताहात रोटरी पीस कौन्सीलींग व हिलींग सेंटरचा शुभारंभ, घोषवाक्य व निबंध स्पर्धा, सातच्या आत घरात? पथनाटयाचे सादरीकरण, तसेच मुलगी वाचवा-सुरक्षित ठेवा, सेव्ह गर्ल -सेफ गर्ल या विषयावर विविध ६ शाळांमध्ये कार्यशाळा व २१ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय शांतता दिवसाच्या दिवशी रोटरी शांतता पदयात्रा, सामुहिक मेडिटेशन, सह्यांची मोहिम, शांततेची प्रतिज्ञा आदी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.




रोटरी शांतता सप्ताह व कौन्सीलींग सेंटरचे उद्घाटन करतांना प्रमोद पारीख, डॉ. सुधा कांकरिया, प्रसन्न खाजगीवाले, ॲड. आराधना चौधरी, नितिन थाडे, सुभाष गर्जे व इतर.

याप्रसंगी रोटरी कौन्सींलींग-हिलिंग सेंटरचे उद्घाटन बोर्डचे अनावरण करून प्रमोद पारीख यांच्या हस्ते झाले.

ॲड. आराधना चौधरी यांनी त्यांच्या क्षेत्रातील अनुभव सांगत समाजामध्ये वाढत चाललेली अशांतते बद्दल चिंता व्यक्त केली. त्या म्हणाल्या कौन्सीलींग सेंटर ही काळाची गरज आहे. सर्व वयोगटातील सर्व क्षेत्रातील सर्वांनाच कौन्सीलींगची गरज आहे. हे कौन्सीलींग सेटर चिंताग्रस्त व्यक्तीच्या मनातील घालमेल दूर करून त्यांना जीवनाची स्पष्ट दिशा देईल. मनाची शांतता, मेडिटेशन व जीवनकौशल्य यातुन प्राप्त होतील.

सुरूवातीला रोटरी क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष नितीन थाडे यांनी स्वागत केले. रोटरीच्या विविध सेवा कार्याची माहिती सांगितली.

रोटरीचे प्रांतपाल डॉ. सुरेश साबु व मेन्टल हेल्थचे डायरेक्टर डॉ. प्रकाश आंबेकर यांचा व्हिडीओ संदेश दाखविण्यात आले. उपप्रांतपाल प्रसन्न खाजगीवाले यांचे शुभेच्छापर भाषण झाले. रोटरीचे सचिव सुभाष गर्जे यांनी डॉ. सुधा कांकरिया लिखित 'शांतीदूत' हे गीत सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळविली. आभार प्रदर्शन श्री. गर्जे यांनी केले.

सुत्रसंचालन भावना वैकर यांनी केले. शेवटी 'शांतता प्रतिज्ञा' ने कार्यक्रमाची सांगता झाली. सप्ताह यशस्वी करण्यासाठी पुरूषोत्तम जाधव, दादा करंजुले, डॉ. सर्जेराव निमसे, डॉ. प्रकाश कांकरिया, निलेश वैकर, माधवराव देशमुख, जवाहर मुथ्था तसेच कौशिक कोठारी, हर्षवर्धन सोनवणे, प्रिती सोनवणे, रविंद्र राऊत, अनघा राऊत, साधना देशमुख आदि ठोंबे हे प्रयत्नशील आहेत.

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



आपण केलेल्या परीक्षा आणि आपली घड्याळे नेहमीच बदलत असतात.

तात्पर्य : घड्याळे ज्याप्रमाणे मागे-पुढे होत असतात, त्याप्रमाणे आपण ज्या ज्या माणसांची परीक्षा केलेली असते, त्यांच्या स्वभावाचा अंदाज बांधलेला असतो, त्यात परिस्थितीनुरुप बदल होण्याची शक्यता असते. त्यात आपलीही काही चूक होण्याची शक्यता असते. ती चूक काही वेळेला आपल्या ध्यानातही येत नाही. ही जाणीव ठेवली, तर आपल्या हातून कोणावर अन्याय होणार नाही, आणि आपल्यावर पश्चात्तापाची पाळी येणार नाही.

आशा ही निराशेची छोटी बहिण आहे.

तात्पर्य : मनुष्य खुप आशा करतो, पण त्याच्या सगळ्याच आशा काही पुऱ्या होत नाहीत. काही वेळेला त्याची निराशाही होते. म्हणजे जेथे आशा आहे, तेथे निराशेचीही शक्यता आहे. ही गोष्ट जर प्रत्येकाने ध्यानात ठेवली, तर निराशेमुळे आपण तितकेसे दु:खी होणार नाही.

## दिनविशेष २०सप्टेंबर २०२४

१८५३: चुलालोंगकोर्ण तथा राम (पाचवा) – थायलँडचा राजा (मृत्यू: २३ आक्टोबर १९१०)

१८५६: साली भारतातील आध्यात्मिक नेते आणि समाजसुधारक नारायण गुरु यांचा जन्मदिन.

१८९७: नारायण भिकाजी तथा 'नानासाहेब' परुळेकर – 'सकाळ' वृत्तपत्राचे संस्थापक संपादक, प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाचे अध्यक्ष व भारतीय पत्रकारितेचे पितामह, स्वच्छ समाजदृष्टी, उक्ती व कृती यातील करडी शिस्त या असाधारण गुणांमुळे नानासाहेब परुळेकर हे स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी पत्रकारितेतील सदैव स्मरणात रहावे असे व्यक्तिमत्त्व ठरले. त्यांना पद्मभूषण सन्मानाने गौरविण्यात आले होते. 'निरोप घेता' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. (मृत्यू: ८ जानेवारी १९७३)

१९०९: गुलाबदास हरजीवनदास ब्रोकर – गुजराती लेखक व समीक्षक, पद्मश्री (१९९१), गुजराती साहित्य परिषदेचे अध्यक्ष, गुजरातीतील मनोविश्लेषणात्मक कथेची सुरुवात करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. (मृत्यू: १० जून १९०६ – पुणे)

१९११: भारतीय तत्त्वज्ञानी आणि कार्यकर्ते श्रीराम शर्मा यांचा जन्म (मृत्यू: २ जून १९९०)

१९२१: क्रिकेटपटू पनानमल पंजाबी यांचा जन्म.

१९२२: द. न. गोखले – चरित्र वाङ्मयाचे गाढे संशोधक, मराठी शुद्धलेखनाचे अभ्यासक, पुणे विद्यापीठाने त्यांना डी. लिट पदवी देऊन गौरविले होते.

१९२३: भारतीय अभिनेते आणि निर्माते अक्किनेनी नागेश्वर राव यांचा जन्म (मृत्यू: २२ जानेवारी २०१४)

१९२५: आनंद महिडोल तथा राम (सातवा) – थायलँडचा राजा (मृत्यू: ९ जून १९४६)

१९३४: सोफिया लॉरेन – हॉलीवूडमधील इटालियन अभिनेत्री

१९३४: भारतीय व्यंगचित्रकार आणि पत्रकार राजिंदर पुरी यांचा जन्म. (मृत्यू: १६ फेब्रुवारी २०१५)

१९४४: क्रिकेटपटू रमेश सक्सेना यांचा जन्म.

१९४६: भारतीय वकील आणि न्यायमूर्ती मार्कंडेय काटजू यांचा जन्म.

१९४९: महेश भट्ट – चित्रपट दिग्दर्शक

मृत्यू / पुण्यतिथी / स्मृतिदिन:

१३३८: दिल्ली येथील तुघलक वंशीय सत्तेचे सम्राट शासक फिरोज शाह तुगलक तृतीय यांचे निधन.

१८१०: मीर तकी मीर – ऊर्दू शायर (जन्म: ? ? १७२३)

१९१५: संत गुलाबराव महाराज (जन्म: ६ जुलै १८८१)

१९२७: पॅन-इस्लामिक चळवळीबद्दल सहानुभूती असलेले भारतीय क्रांतिकारक अब्दुल हाफिज मोहम्मद बराकतउल्ला यांचे निधन.

ॲनी बेझंट – थिऑसॉफिस्ट

१९२८: केरळमधील समाजसुधारक नारायण गुरू यांचे निधन.

१९३३: ॲनी बेझंट – थिऑसॉफिस्ट, सामाजिक कार्यकर्त्या व भारतीय स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या, त्यांनी हिंदू धर्म व संस्कृतीचे सखोल अध्ययन केले होते. त्यांनी भगवद्गीतेचे इंग्रजीत भाषांतर केले होते. त्यांची ग्रंथसंख्या सुमारे ४५० इतकी आहे. १९१६ मध्ये त्यांनी 'होमरुल लीग'ची स्थापना केली. (जन्म: १ आक्टोबर १८४७)

१९४२: भारत छोडो आंदोलनाच्या वेळेला राष्ट्रध्वज घेऊन निघालेल्या मिरवणूकीचे नेतृत्व करीत असतांना केलेल्या गोळीबारात थोर भारतीय क्रांतिकारक महिला कनकलता बरुआ यांचे निधन झाले.

## विरंगुळा

पद्धतः बाजुला दिलेल्या असंबद्ध शब्दामधून एक अर्थपूर्ण शब्द तयार होतो तो चौकटीत लिहा व मध्ये लिहिल्या गेलेल्या शब्दातून एक शब्द तयार होतो त्या शब्दाच्या सहाय्याने दिलेले अर्धवट वाक्य पूर्ण करा.

व र ा अ र ` ी

त प ं ी ल ा क

म ` प श ् ` द ी

कर्माच्या गती असती गहना जे जे होणार ते कदा चुकेना ।।
ते ते भोगल्याविण सुटेना ___ सर्वांसी ।।

| | | | |
|---|---|---|---|
| रा | ज्य | शा | स्त्र |
| मो | र | पं | खी |

| | | | |
|---|---|---|---|
| कु | ळ | क | र्णी |
| वी | णा | का | व्य |

मागील उत्तर : करणारा

## शब्दरंजन

### आडवे संकेत

२) लोभी, हाव असणारा
५) संतापी, भ्रमिष्ठ
८) एक राष्ट्रगीत ११) मानव
१२) एका हाताची ओंजळ
१४) बोभाटा, प्रसिद्धी
१५) एक टी.व्ही. कंपनी
१६) पोपट १८) घेराव
१९) चढलेला
२१) सर्वांनी करावयाचा एकसारखा व्यायाम
२५) कसातरी
२७) चंचु
२९) वयाने मोठा
३०) अस्सल, खास
३१) इटलीची राजधानी
३२) तण, गाईचा चारा
३३) एक पारदर्शक वस्तू
३४) भाद्रपद महिना
३७) ऐष, विश्रांती
३८) लुळापांगळा
३९) गाद्या वगैरे ठेवण्याचे साधन
४१) वस्त्र
४३) भुतकाळ
४६) या दोन गोष्टी म्हटल्या की सुखी संसाराची राखरांगोळी झालीच समजा
४८) सूर्य
४९) महिना
५०) मानले जाणे, मान्य होणे
५१) वाढते

### उभे संकेत

१) पानविड्यातील एक पदार्थ
२) हातांनी करावयाच्या खुणा
३) नवरदेव
४) गमणे, खेळणे
५) ज्याला मान आहे असा
६) म्हातारा, वयस्क
७) अनिल कपूर, श्रीदेवी यांचा एक चित्रपट.
९) औदुंबर, कल्पवृक्ष
१०) वस्त्र विणण्याचे साधन
१३) एक आडनाव
१७) आंब्याची बी
१९) आजपर्यंत
२०) मागचा पुढचा विचार न करता कामे करणारा
२१) ठिपक्या वर्णाचा
२२) वेळू, बांबू
२३) अंतर, फरक
२४) मान असलेला
२६) भोळा, निष्कपटी
२८) एक बंगाली मिठाई
३०) अंगात विद्या नसताना दुसऱ्यास जिंकण्यात व नाना प्रकारे ढंग करण्यात प्रविण असा मनुष्य
३४) पळकाढ्या
३५) सारखी बडबड
३६) विश्वास, खात्री
३९) मेघ, तीन
४०) ताळ्यावर येईपर्यंत चोपणे
४२) एक मुसलमानी नाव
४४) हळू चालणारा एक प्राणी
४५) सोसणे
४६) उर्वरित, शिल्लक
४७) एक कर्णभूषण
४८) ध्वनी, आवाज
४९) बाबाचा साळा

### कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | सा | द | | प्र | सा | र | भा | र | ती | | शि | वा |
| वा | ख | र | | ख | र | | त | ण | | रा | | ही |
| ह | र | | पु | र | ण | | वा | र | स | दा | र | |
| | झो | प | णे | | | क | ढ | ण | | च | क | वा |
| झो | प | डी | | पा | ख | ळ | णी | | म | र | म | र |
| टिं | | क | वा | य | त | | | म | र | ण | | वि |
| ग | ज | | त | ल | म | | पा | ऊ | ण | | भा | ला |
| पा | ल | ग | ड | | | | ली | | क | ढी | | सि |
| त | | र | | स | प | क | | वि | ळ | | मु | नी |
| शा | ई | ल | वि | क्री | डी | त | | टी | | | जु | |
| ही | | | ना | य | क | वा | डा | | द | ह | म | |
| | व | ल | य | | | र | | सु | म | | दा | रा |
| धों | डी | | क | म | ची | | पा | की | ट | मा | र | णे |




१) सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ कोणी लिहिला?
अ)महात्मा गांधी ब)ज्योतीबा क)सावरकर ड)कृष्णाजी पांडूरंग भालेकर

२) लोकमान्य टिळक व आगरकर डोंगरीच्या तुरुंगातून मुक्त झाले तेव्हा त्यांचा सत्कार कोणी घडवून आणला?
अ)पंडित नेहरु ब)लाला लजपतराय क)महात्मा फुले ड)विनोबा भावे

३) महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा मृत्यू कोण्यावर्षी झाला?
अ)१९६१ ब)१९६२ क)१९६३ ड)१९६४

४) गो.ग. आगरकर यांचा जन्म खालीलपैकी कधी झाला?
अ)१४ जुलै १८५६ ब)१२ऑगस्ट १८५८
क)९ सप्टेंबर १८५५ ड)१० ऑक्टोबर १८५७

५) भारताच्या नव्या कृषी धोरणाचे वर्णन कोणत्या शब्दात केले जाते?
अ)सोनेरी क्रांती ब)रजत क्रांती क)गुलाबी क्रांती ड)इंद्रधनुशी क्रांती

६) अंमलीपदार्थ प्रामुख्याने वेदनाशामक स्वरुपाचे असतात या पदार्थांच्या सेवनामुळे शरिरातील कोणत्या संस्थेचे कार्य मंदावले जाते?
अ)पचन संस्था ब)रक्ताभिसरण संस्था
क)मध्यवर्ती चेतासंस्था ड)उत्सर्जन संस्था

७) समाजवादी काँग्रेसची स्थापना कोणत्या वर्षी झाली?
अ)१९३२ ब)१९३४ क)१९३६ ड)१९३८

८) भारतात कागदाचे सर्वाधिक उत्पादन खालीलपैकी कोठे होते?
अ)नेपानगर ब)बल्लारपूर क)टिटाघर ड)रायगड

९) कितव्या योजनेने कृषीक्षेत्रास अवाजवी महत्त्व दिले होते अशी या योजनेवर टिका केली जाते?
अ)पहिल्या ब)दुसऱ्या क)तिसऱ्या ड)चौथ्या

१०) बनावट मुद्रांकाचा सुत्रधार खालीलपैकी कोण?
अ)महमद हुसेन तेलगी ब)महमद करिम तेलगी
क)अब्दुल कलीम तेलगी ड) अब्दुल हुसेन तेलगी

११) जागतिक मानवाधिकार दिन कोणत्या तारखेस साजरा केला जातो?
अ)१० डिसेंबर ब)१२ डिसेंबर क)१२ जानेवारी ड)९ जानेवारी

१२) सन २००१ मधील जनगणना अहवालामध्ये कमीतकमी किती लोकसंख्या असलेल्या शहरांचा उल्लेख **मेगासिटी** करण्यात आला?
अ)२५ लाख ब)५० लाख क)३८ लाख ड)७५ लाख

१३) मानवी शरिरातील सर्वात मोठी ग्रंथी कोणती?
अ)यकृत ब)थायरॉईड क)प्लीहा ड)मस्तीष्क

१४) जडपाण्याचा अनुभारांक किती? अ)२० ब)३० क)३५ ड)४०

१५) नाना शंकर शेठ यांचा मुंबईचे अनभिषीक्त सम्राट या शब्दात कोणी गौरव केला? अ)टिळक ब)प्र.के. अत्रे क)टाटा ड)गांधी

१६) इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ फॉरेन ट्रेड हि संस्था कोठे आहे?
अ)चेन्नई ब)दिल्ली क)कलकत्ता ड)कन्याकुमारी

१७) जागतिक पातळीवरील चहाचे उत्पादन लक्षात घेता पहिल्या क्रमांकावर असलेले राष्ट्र कोणते?
अ)श्रीलंका ब)स्वीत्झर्लँड क)भारत ड)जपान

१८) १७६४ ची बक्सारची लढाई जिंकून इंग्रजांनी भारतात सत्तेचा पाया बळकट केला ही लढाई त्यांनी कोणाविरुद्ध जिंकली होती?
अ)बंगालचा परागंदा नवाब मीर कासीम
ब)अयोध्येचा नवाब शुजा उद्देल्ला
क)दिल्लीचा बादशाह शाह आलम
ड) वरील तिघांच्या युतीविरुद्ध

१९) नंतरच्या काळात हरिजन सेवक समाज म्हणून प्रसिद्धीस आलेल्या अखील भारतीय अस्पृश्य संघाचे पहिले अध्यक्ष म्हणून कोणाचा उल्लेख होतो?
अ)घनशामदास बिर्ला ब)जगमोहन सिन्हा
क)इंदिरा गांधी ड)दयानंद बांदोडकर

२०) खालीलपैकी कोणाच्या कारकिर्दीत विल्कीन्स याने भगवतगीतेचे प्रथमच इंग्रजी भाषांतर केले?
अ)लॉर्ड वेलस्ली ब)वॉर्न हेस्टींग्ज क)लॉर्ड विल्यम ड)लॉर्ड बेंटीक

२१) भारतातील ब्रिटिश राजवटीला शह देण्यासाठी नेपोलियनशी संधान बांधणारा हिंदी राज्यकर्ता कोण?
अ)टिपू सुलतान ब)हैदरअली क)सरजदुनाथ सरकार ड)निजाम

२२) तात्या टोपेला शिप्री येथे कधी फाशी देण्यात आली?
अ)१८ एप्रिल १८५९ ब)१ मे १८६२
क)१७ जुन १८५५ ड)११ मे १८५७

२३)खालीलपैकी कोणच्या कारकिर्दीत पंजाब राज्य खालसा करुन ब्रिटिश साम्राज्यात समाविष्ठ करण्यात आले?
अ)लॉर्ड कॅनिंग ब)लॉर्ड डलहौसी
क)लॉर्ड वेलस्ली ड)लॉर्ड हार्डिंग्ज

**उत्तरः (१-ब), (२-क), (३-ब), (४-अ), (५-ड), (६-क), (७-ब), (८-अ), (९-अ), (१०-क),(११-अ), (१२-ब), (१३-अ), (१४-अ), (१५-ब), (१६-ब), (१७-क), (१८-ड), (१९-अ), (२०-ब),(२१-अ), (२२-अ), (२३-ब).**

## फिल्मीरंजन

### आडवे संकेत

१) चाची ४२० चित्रपटाचा नायक.
४) सन २००२ मध्ये बनलेल्या राज चित्रपटाची नायीका.
७) सन १९८८ मध्ये बनलेल्या बिवी हो तो ऐसी चित्रपटाची नायीका.
८) आमिर खान आणि मनिषा कोईरालाचा एक चित्रपट.
९) अजय देवगण आणि अक्षय खन्नाचा चित्रपट.
१०) सन २००३ मध्ये आलेल्या या चित्रपटात सनी देओल आणि तब्बु होते.
११) चुरा लिया है तुमने या चित्रपटातील नायीका.
१३) शाहरुख खान, ऐश्वर्या रॉय आणि माधूरी दीक्षीतचा चित्रपट.
१५) हो तो ऐसा (चित्रपट)
१६) मिल गया (चित्रपट)
१७) किशन (चित्रपट)
१८) तुझे (चित्रपट)
१९) हलाल (चित्रपट)
२१) अमिताभ बच्चन, जैकी श्रॉफ आणि गुलशन ग्रोवरचा चित्रपट.
२२) एस (गायीका)
२४) दुल्हनिया ले जायेंगे (चित्रपट)
२५) तेरा चल गया (चित्रपट)
२६) सन २००१ मध्ये आलेल्या अक्स चित्रपटात अमिताभ बच्चनची नायीका.
२८) अभिषेक बच्चन आणि हृषिता भटचा चित्रपट.
३०) काला गोरे लोक (चित्रपट)

### उभे संकेत

१) सन २००३ मध्ये आलेल्या या चित्रपटात अजय देवगन आणि नेहा धुपिया होते.
२) सन १९९९ मध्ये आलेल्या या चित्रपटात सलमान खान आणि अजय देवगन होते.
३) ऋषी कपूर आणि श्रीदेवीचा चित्रपट.
५) देवता (चित्रपट)
६) विवेक ओबेरॉयचे नायक पिता.
११) आमदनी अठ्ठणी खर्चा रुपय्या चित्रपटाची नायीका.
१२) आज का (चित्रपट)
१४) सन १९९८ मध्ये आलेल्या जब प्यार किसीसे होता है या चित्रपटाचा नायक.
१५) गली में श्याम (चित्रपट)
१७) कुछ कुछ होता है या चित्रपटाचे संगितकार.
२०) अकेले तुम (चित्रपट)
२१) सन २००० मध्ये टि. रामाराव दिग्दर्शीत या चित्रपटात अनिल कपूर, रजनीकांत, रविना टंडन होते.
२२) या चित्रपटात अमिताभ बच्चन, जयाप्रदा, अमृता सिंह, आदित्य पांचोली होते.
२३) मोहब्बतें चित्रपटात जुगल हंसराजची नायीका.
२६) जब जब फुले खिले या चित्रपटाची नायीका.
२७) सन १९९९ मध्ये सुभाष घई दिग्दर्शीत या चित्रपटात अक्षय खन्ना आणि अनिल कपूर होते.
२९) अग्निहोत्री (नायीका)



### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | ति | श | कौ | शी | क | | | ना | | अ | क्स | |
| | | रा | | | | | ह | म | रा | ज | | ई |
| ते | | बी | स | सा | ल | बा | द | | | न | गी | ना |
| रा | ज | | | ह | | | क | | | बी | | मी |
| मे | ज | र | सा | ब | | | र | क्ष | क | | | ना |
| रा | | ति | | जा | | | दि | | वि | | डॅ | डी |
| सा | | अ | | दे | व | | आ | फ | ता | ब | | क्र |
| थ | | ग्नि | | | न | | प | | कृ | | आ | |
| र | | हो | | | टु | | ने | | ष्ण | | अ | |
| हे | | त्री | | म | का | न | | | मु | का | ब | ला |
| | | | | | फो | | त्रि | मु | र्ती | | | ल |
| जु | ल्म | की | जं | जी | र | | दे | | | | मि | |
| ल्मी | | | ग | | | | व | क्त | ह | मा | रा | है |

## ‘सिद्धार्थ वाणी’

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।



भक्तामरचा संपुट चालू आहे. पाहता पाहता आज नऊ गाथापर्यंत आलो. आज नववी गाथेचा संपुट करण्यात आले. ह्या गाथेत आचार्यश्री मानतुंगजी स्तुती करताना म्हणतात,

हे देवा! तुमची स्तुती केवळ सर्वदोष आणि पापाचा नाश करणारी नाही तर तुमचे योग्य कथन देखील सर्व पापांना नष्ट करते. हजार किरणांसह सूर्य चमकेल पण त्याच्या किरणांमुळे सरोवरातील कमळही फुलते. हे प्रभो! मी कमळा आहे. तुम्ही सूर्य आहात. तुमच्या दिव्य प्रकाशाचा स्पर्श मिळाल्याने माझे आध्यात्मिक जीवन कमळासारखे फुलले आहे. माझ्या आत असीम आनंद वाढत आहे. हे प्रभो! तुम्ही सर्व दोषापासून मुक्त आहात आणि तुमची स्तुतीही दोषांचा नाश करणारी आहे.

‘‘ज्ञानाचे वादळ आले, भ्रमाची भिंत कोसळली, भ्रम उडून गेला, नामावर प्रेम सुरू झाले.’’

जेव्हा सूर्य उगवतो, सरोवराची कमळ फुलतात आणि जेव्हा जेव्हा तीर्थंकराचे शुभ पर्व येतात तेव्हा संसारी जीव आनंदित होतात. चारही जीवांना क्षणिक सुख आणि शांती मिळते.

हे दयाळू परमेश्वर! आसक्ती, द्वेष या सर्व दुर्गुणांपासून तुम्ही मुक्त आहात. तुमचे सर्व दोष नाहीसे झाले आहेत म्हणून भक्ति डोलत, आचार्य सर्व पाप आणि दोषापासून मुक्त होण्यासाठी भगवान आदिनाथांच्या चरणी नाम, महिमा आणि बाळाच्या रूपात भक्ति पुष्प अर्पण करतात.

**‘‘गाथा’’ ९**

(भय नाशक – फलदायक)

*आस्तांतव स्तवन,मस्त समस्त–दोषं –*
*त्वत्संकथापि जगतां दुरितानि हन्ति ।*
*दूरे सहस्त्र किरणः कुरुते प्रभैव –*
*पद्‌माकरेषू जलजानि विकास भाजि ।।९।।*

**अर्थ** :– केवळ तुमची स्तुती सर्व दोषांपासून मुक्त नाही तर तुमची पवित्रता व्यक्तिंच्या जीवांच्या पापांचा नाश करते. जसे सूर्याच्या प्रकाशामुळे तलावात कमळ वाढतात.

तेजस्वी सूर्य दूर आहे, तरीही पहाटेच्या वेळी त्याच्या मऊ चमकाने झुकलेल्या कमळाच्या कळ्या फुलतात. त्याचप्रमाणे हे जीना! तुमच्या स्तुतीची अगाध शक्ती फक्त तुमच्या नामाच्या भक्तिभावाने उच्चार केल्याने सांसारिक प्राण्यांच्या पापाचा नाश होतो आणि त्यांची शुद्धी होते.

अशा प्रकारे स्तुती करताच नववी (कडी) कुलुप उघडले.

**– सौ. सविता चोरडिया**

# महापालिकेचे उत्पन्न वाढीसाठीचे नवीन स्रोत निर्माण करावे लागणार

### उपायुक्त विजयकुमार मुंडे यांचे प्रतिपादन; मनपा कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोग लागू होण्यासाठी प्रयत्न करणारे अधिकारी व युनियनच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार

नगर – मनपा कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. आता तो सर्वांच्या सहकार्यातून मार्गी लागला असून त्याला यश आले आहे. आता आपल्या सर्वांची जबाबदारी वाढली असून महापालिकेचे उत्पन्न वाढीसाठी नवीन स्रोत निर्माण करावे लागणार आहे. मनपा कर्मचारी पतसंस्थेचा ज्या पद्धतीने चांगला कारभार करून एक वर्षात दुप्पट भाग भांडवल केले. त्याच पद्धतीने कर्मचाऱ्यांनी मनपाची थकीत वसुली करण्यासाठी काम करावे शहरामध्ये ८० कोटी थकीत असून त्यावर १२० कोटी व्याज आहे. आता शास्ती माफी केली असून कर्मचाऱ्यांनी थकीत नागरिकांकडे जाऊन त्यांना समजून सांगावे. मनपा हे आपल्या सर्वांचे एक कुटुंब असून एकजुटीने मनपाच्या भरभराटीसाठी काम करावे, असे प्रतिपादन उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी केले.





मनपा कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोग लागू होण्यासाठी प्रयत्न करणारे अधिकारी व युनियनच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कारप्रसंगी बोलताना उपायुक्त विजयकुमार मुंडे. (छाया – लहू दळवी)

मनपा कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोग लागू होण्यासाठी प्रयत्न करणारे अधिकारी व युनियनच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्था संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आला. यावेळी उपायुक्त विजयकुमार मुंडे, सहायक आयुक्त मेहेर लहारे, मुख्य लेखापरीक्षक विशाल पवार, जल अभियंता परिमल निकम, शहर अभियंता मनोज पारखे, नगररचनाकार सर्वेश चाफळे, अभियंता श्रीकांत निंबाळकर, चेअरमन बाळासाहेब पवार, व्हा.चेअरमन सोमनाथ सोनवणे, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल, सतीश ताठे, विकास गीते, किशोर कानडे, बलराज गायकवाड, अजय कांबळे, विजय कोतकर, कैलास चावरे, गुलाब गाडे, बाळासाहेब गंगेकर, जल अभियंता परिमल निकम, महादेव काकडे, संचालिका प्रमिलाताई पवार, उषाताई वैराळ, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी आदी उपस्थित होते.

यावेळी जल अभियंता परिमल निकम, नगररचनाकार सर्वेश चाफळे यांनी मनोगत व्यक्त केले. चेअरमन बाळासाहेब पवार यांनी उपस्थितांचा सत्कार केला तर स्वागत जितेंद्र सारसर यांनी केले.

महानगरपालिकेत काम करत असताना कर्मचारी हा महत्त्वाचा घटक असून त्यांचे प्रश्न मार्गी लागणे तितकेच गरजेचे आहे. आम्ही राज्य सरकारमध्ये काम करत असून आम्हाला गेल्या पाच वर्षांपूर्वीच सातवा वेतन आयोग लागू झाला आहे मात्र नगर महापालिकेतील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाचा लाभ मिळाला नव्हता. आता तो मिळाला आहे अधिकारी नेहमीच कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लागावे यासाठी अग्रही असतात कामगार युनियन आणि मनपा कर्मचारी पतसंस्था ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत पतसंस्था ही कामगारांचे आर्थिक प्रश्न मार्गी लावतात तर युनियन देखील प्रशासकीय पातळीवरील प्रश्न मार्गी लावण्याचे काम करत असते. महापालिका ही स्वयं संस्था असून तिच्या प्रगतीसाठी आपण सर्वजण मिळून काम करू असे मत मुख्य लेखा परीक्षक विशाल पवार यांनी व्यक्त केले.

कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाचा प्रश्न गेल्या आठ वर्षांपासून प्रलंबित होता तो मार्गी लागावा यासाठी आंदोलने, लाँग मार्च, निवेदने दिली मात्र तो मार्गी लागला नाही आता युनियनच्या माध्यमातून पदाधिकाऱ्यांनी उपोषण केले आणि आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून राज्य सरकारने मनपा कर्मचाऱ्यांचा प्रलंबित सातवा वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लावला. यामध्ये महापालिकेतील अधिकारी यांचे देखील मोठे सहकार्य लाभले आहे लवकरच कर्मचाऱ्यांच्या खात्यावर सातवा वेतन आयोगा सहित पगार जमा होईल या कामासाठी सर्वांनी सहकार्य केल्याबद्दल त्यांचा सत्कार महापालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले असल्याची माहिती संचालक बाबासाहेब मुदगल यांनी दिली. प्रास्ताविक किशोर कानडे व सूत्रसंचालन अनंत द्रविड यांनी केले तर आभार प्रदर्शन अनंत लोखंडे यांनी मानले.

# संत ज्ञानेश्वर सृष्टीचा प्रकल्प आराखडा त्वरित सादर करा : पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

नगर – नेवासे येथे उभारण्यात येणाऱ्या संत ज्ञानेश्वर सृष्टीचा प्रकल्प आराखडा आणि अहिल्यादेवी स्मारकाच्या जागेबाबत प्रस्ताव त्वरित सादर करावा, असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.



नेवासे येथे उभारण्यात येणाऱ्या संत ज्ञानेश्वर सृष्टीचा प्रकल्प आराखडा त्वरित सादर करण्याचे आदेश देताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील. समवेत बैठकीस उपस्थित असलेले जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आदी.

जिल्हाधिकारी कार्यालयात संत ज्ञानेश्वर सृष्टी विकास आराखडा आणि अहिल्यादेवी स्मारकाबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील आदी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले, संत ज्ञानेश्वर सृष्टीचे काम पर्यावरण बदलाच्या पार्श्वभूमीवर टिकणारे आणि भूकंपरोधक असावे. या सृष्टीच्या भव्यतेसोबत भेट देणाऱ्याला अध्यात्मिक वातावरणाचा अनुभव येईल अशी रचना असावी. मुख्यमंत्री महोदयांकडे या विकास आराखड्याचे सादरीकरण लवकरच करण्यात येईल. नेवासाचे स्थान महात्म्य देशभरात पोहोचविणारे हे स्मारक असावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक देशातील उत्तम स्मारकांपैकी एक असेल असा आराखडा तयार करावा. स्मारकाच्या ठिकाणी महिला सक्षमीकरण केंद्र असावे. महिला सक्षमीकरणाच्यादृष्टीने विविध प्रशिक्षण, अभ्यासक्रम आदींची सुविधा येथे असावी, अशा सूचना त्यांनी केल्या. यावेळी संत ज्ञानेश्वर सृष्टी आणि अहिल्यादेवी स्मारकाबाबत सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली.

### अहमदनगर – शिर्डी रस्त्याच्या कामाचा आढावा

पालकमंत्री विखे पाटील यांनी अहमदनगर – शिर्डी रस्त्याच्या कामाचाही आढावा घेतला. रस्त्याची कामे करतांना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ट्रॅफिक वॉर्डन नेमावे. अजूनही महामार्गावरील खड्डे दुरुस्तीचे काम पूर्ण झालेले नाही, ते त्वरित करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

# जिल्हा मराठा समाज सेवा मंडळाच्यावतीने मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

### गुणवंत विद्यार्थ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा समाज सेवा मंडळाचे वतीने दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा मराठा व मराठा कुणबी समाजातील मार्च २०२४ या १० वी शालान्त परिक्षेत ९५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा लवकरच गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात येणार आहे, या विद्यार्थ्यांना मंडळाचे वतीने प्रमाणपत्र व प्रोत्साहन बक्षीस देण्यात येणार आहे.

तरी १० वी परीक्षेत ९५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवलेल्या मुला–मुलींनी आपले दहावी परीक्षेचे गुणपत्रक झेरॉक्स व पत्ता स्वताचे किंवा पालकांचे मोबाईल / व्हाटसअॅप नंबरसह मंडळाचे मुख्य कार्यालय बारातोटी कारंजा, बडोपंताची हावेली, माळीवाडा, अहमदनगर या ठिकाणी असलेल्या जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्थेच्या कार्यालयात येत्या १५ दिवसांचे आत म्हणजे ३ ऑक्टोंबरपर्यंत जमा करावीत, असे समाजबांधवांना आवाहन मंडळाचे सहसचिव बाळकृष्ण मारुती काळे यांनी केले आहे.



पेन्शनर्स प्राथमिक शिक्षक संघाच्या नगर तालुका अध्यक्षपदी सूर्यभान काळे यांच्यासह नूतन कार्यकारिणी निवड प्रसंगी उपस्थित जिल्हा पदाधिकारी व संघाचे सभासद.

# पेन्शनर्स प्राथमिक शिक्षक संघाच्या नगर तालुकाध्यक्षपदी सूर्यभान काळे

नगर – अहमदनगर जिल्हा पेन्शनर्स प्राथमिक शिक्षक संघाच्या नगर तालुका अध्यक्षपदी सूर्यभान काळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. तर कार्याध्यक्ष सुनील घोलप, सरचिटणीसपदी बबन कुलट व महादेव चोभे उपाध्यक्षपदी संजय देवराम धामणे, भाऊसाहेब सिलामन काळे यांच्याही निवडी करण्यात आल्या आहेत.

अहमदनगर जिल्हा पेन्शनर्स प्राथमिक शिक्षक संघाच्या नगर तालुका शाखेचे त्रैवार्षिक अधिवेशन नुकतेच नगरमधील शिक्षक बँकेच्या मुख्य शाखेतील सभागृहात आयोजित करण्यात आले होते. जिल्हा संघाचे सरचिटणीस ब.द.उबाळे यांचे अध्यक्षतेखाली हे अधिवेशनात पार पडले. त्यात आगामी ३ वर्षांसाठी नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली. उर्वरित पदांची निवड ही विभागवार प्रतिनिधी घेऊन करण्यात येणार आहे.

यावेळी खासदार निलेश लंके यांचे वडील ज्ञानदेव लंके गुरुजी, बाळासाहेब नलगे, श्री.जगताप, शिक्षक बँकेचे माजी चेअरमन रा.वि. शिंदे, श्री.थसाळ, तुकाराम कातोरे, वि.नि. कोल्हे, रो.ना.पादीर, श्री.इथापे, कल्याण कदम यांनी मनोगत व्यक्त केले. अधिवेशनात मागील ३ वर्षांचा ताळेबंद रो.ना.पादीर यांनी मांडला, त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. यावेळी किशोर हारदे, नानासाहेब जाधव, श्री. टकले, महिला प्रतिनिधी शामला साठे, रत्नाताई उंडे, वसुधा दहातोंडे, प्रमिला खडके, श्रीमती देशमुख, श्रीमती दातिर, श्रीमती बोबडे यांच्यासह सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षिका उपस्थित होत्या. सूत्रसंचालन वि.नि.कोल्हे यांनी केले तर आभार अरुण दळवी यांनी मानले.

# जिल्ह्यातील औद्योगिक आणि पर्यटन विकासाचे योग्य नियोजन करा : ना. विखे पाटील

नगर – राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत जिल्ह्यातील विविध विकासकामांचा आढावा घेतला. राज्य शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आणि जिल्ह्यात नवीन उद्योग आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.



जिल्ह्यातील औद्योगिक आणि पर्यटन विकासाचे योग्य नियोजन करण्याचे निर्देश देताना जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील. बैठकीत उपस्थित असलेले जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ व इतर शासकीय अधिकारी.

बैठकीस जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिपक दातीर, पर्यटन उपसंचालक मधुमती देसाई, एमआयडीसीचे प्रादेशिक व्यवस्थापक नितीन गवळी आदी उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील यांनी जिल्ह्यातील पर्यटन विकास आराखड्याबाबत आढावा घेतला. ते म्हणाले, जिल्ह्यात टुरिझम सर्किट विकसित करण्यासाठी आराखडा तयार करण्यात यावा. पर्यटनस्थळांचा विकास करतांना एकात्मिक दृष्टिकोन ठेवावा. पर्यटकांसाठी आवश्यक सुविधा, पायाभूत सुविधांचा विकास, पर्यटनाच्यादृष्टीने कौशल्य विकासावर भर आदी बाबींवर विशेष भर द्यावा. ऐतिहासिक पर्यटनस्थळांचे संवर्धन आणि तेथील सुविधांकडे लक्ष द्यावे. अशा ठिकाणी स्वच्छता राहील याची दक्षता घ्यावी.

### जिल्ह्यातील औद्योगिक विकासाचा आढावा

जिल्ह्यातील नवीन मंजूर झालेल्या औद्योगिक क्षेत्रात उद्योग सुरू व्हावेत यादृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी. मोठे उद्योग आल्यावर त्याच्याशी निगडित इतर उद्योग–व्यवसाय परिसरात विकसित होतात. उद्योगांसाठी जागा आवश्यक असल्यास उपलब्ध करून देण्यात येईल. अहमदनगर जिल्ह्यात औद्योगिक विकासाला संधी असल्याने उद्योग विकासासाठी उद्योजक परिषदेचे आयोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्यात उद्योगांसाठी एक हजार एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. अहमदनगर येथून वंदे भारत रेल्वे सुरू करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात अहमदनगर जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे. निर्यातवृद्धीसाठी जिल्हा गुंतवणूक परिषदेत ५ हजार कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले, त्यापैकी अडीच हजार कोटींचे उद्योग सुरू झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

संगमनेर, श्रीरामपूर, जामखेड, राहुरी आणि पारनेर येथे उभारावयाच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कामाचांही यावेळी आढावा घेण्यात आला.

### राज्य शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा

राज्य शासनाने लोककल्याणच्या विविध योजना सुरू केल्या आहेत. या योजनांचा लाभ सामान्य जनतेला होईल यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश श्री.विखे पाटील यांनी दिले. पालकमंत्र्यांनी राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांचा यावेळी आढावा घेतला.

ते म्हणाले, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा अधिकाधिक उमेदवारांना लाभ देण्याचा प्रयत्न करावा. यासाठी विविध अस्थापनांची बैठक आयोजित करून त्यांना आवाहन करण्यात यावे. तालुकास्तरावरील विविध आस्थापनांमध्ये युवकांना नियुक्ती देण्यासाठी शिबिराचे आयोजन करावे. मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा लाभ अधिकाधिक ज्येष्ठ नागरिकांना देण्याचे प्रयत्न करावे. शासनाच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

विविध योजनेत जिल्ह्याने चांगली कामगिरी केल्याबद्दल त्यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सर्व यंत्रणांच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. वयोश्री योजनेत जिल्ह्यात अधिकाधिक नागरिकांची नोंदणी झाल्याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत ११ लाख ३६ हजार ९४४ महिलांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत ४ हजारपेक्षा अधिक युवकांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

बैठकीला दुरदृश्य प्रणालीद्वारे जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि एकात्मिक विकास प्रकल्प अधिकारी उपस्थित होते.

# बहिष्कारानंतर दुसऱ्या दिवशी सर्व मंडळांनी केले एकत्रित गणेश विसर्जन

### डी.जे.चा खर्च टाळत खुनी हल्ल्यात जखमी गोरक्षकाला केली आर्थिक मदत

नगर – अनंत चतुर्दशीच्या अगोदरच्या रात्री गावातील गोरक्षकावर ७ ते ८ जणांनी धारदार हत्याराने वार करत खुनी हल्ला केल्याच्या निषेधार्थ जेऊर बायजाबाई (ता.नगर) गावातील सर्व गणेश मंडळांनी मंगळवारी (दि.१७) गणेश विसर्जन मिरवणुकीवर बहिष्कार टाकला. मात्र दुसऱ्या दिवशी बुधवारी (दि.१८) सायंकाळी पोलिसांच्या मध्यस्थी नंतर गावातील सर्व मंडळांनी एकत्र मिरवणूक काढत उत्साहात गणेश विसर्जन केले. विशेष म्हणजे गावात प्रथमच एकत्रित गणेश विसर्जन मिरवणूक काढण्यात आली.

एमआयडीसीचे स.पो.नि. माणिक चौधरी यांनी बुधवारी (दि.१८) दुपारी जेऊर गावात जावून सर्व गणेश मंडळ पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या गुन्ह्यातील एका आरोपीला अटक केलेली असून, इतर आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल, असे आश्वासन दिल्यानंतर गणेश मंडळांनी बहिष्कार मागे घेतला. जेऊर गावात प्रथमच सर्व मंडळांनी एकत्रितरित्या मिरवणूक काढत गणेश विसर्जन केले. याप्रसंगी एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गणेश विसर्जन करण्यावर बहिष्कार टाकण्याचीही जेऊर गावातील पहिलीच घटना आहे.



खुनी हल्ल्यात जखमी झालेला गोरक्षक दीपक शिंदे याच्या प्रकृतीची रुग्णालयात जावून विचारपूस करताना जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले.

गोरक्षक दीपक शिंदे या तरुणाने सोमवारी (दि.१६) रात्री कत्तलीसाठी जनावरे घेवून जाणारा टेम्पो अडवला म्हणून ७ ते ८ जणांच्या टोळक्याने त्याच्यावर तलवार, कोयत्याने हल्ला करून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. या हल्ल्यात गोरक्षक शिंदे गंभीर जखमी असून त्याच्यावर नगरमधील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्याच्यावर ३ शस्त्रक्रिया कराव्या लागणार असल्याने उपचारासाठी मोठा खर्च येणार आहे. त्यामुळे गावातील गणेश मंडळे व तरुण वर्गाकडून त्याच्या साठी आर्थिक मदत जमा केली जात आहे.

### गणेश मंडळांसह शिवाजी कर्डिलेंकडून आर्थिक मदत

जेऊर गावातील विविध १० मंडळांनी वेगवेगळे १० डी.जे. मिरवणुकीसाठी बोलावलेले होते. मात्र ते सर्व रद्द करत त्याचा खर्च टाळून जखमी गोरक्षक दीपक बाबासाहेब शिंदे (रा. जेऊर बायजाबाई, ता.नगर) यांच्या वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत दिली. जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले यांनी गुरुवारी (दि.१९) दुपारी रुग्णालयात जावून दीपक शिंदे याच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच त्याच्या उपचारासाठी आर्थिक मदत त्याच्या कुटुंबीयांकडे सुपूर्द केली. नगर बाजार समितीचे संचालक दत्ता तापकिरे, मधुकर मगर, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवक आघाडी अध्यक्ष रामेश्वर निमसे, माजी उपसरपंच बंडू पवार, उपसरपंच दिनेश बेलेकर, सुनिल पवार आदींनीही रुग्णालयात जावून जखमी दीपक शिंदे याची भेट घेतली.

### अवैध कत्तलखान्यांमुळे परिसर बनतोय संवेदनशील

गोरक्षकावर झालेल्या खुनी हल्ल्यामुळे संपूर्ण गावात तीव्र संताप व्यक्त होत आहे. यापूर्वीही जेऊरगावात दोन गटांत दगडफेक, दंगल घडल्याच्या घटना घडल्या आहेत. ग्रामदैवत देवी बायजामाता यात्रोत्सवातदेखील दगडफेक होऊन अनेक भाविक जखमी झाल्याची घटना चालूवर्षीच घडली होती. दोन समाजात तेढ निर्माण होण्याचे प्रकार वाढले असून, जेऊर गाव संवेदनशील बनत आहे. याला कारणीभूत गावच्या परिसरातील अवैध कत्तलखाने असून या बाबीकडे पोलिसांनी गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे मत ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

